मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

मुंबई/ पालघर | गुरुवार, १० ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ११० | पाने- ८

# केंद्र सरकारची जनतेला दसरा भेट

## तब्बल चार वर्ष मिळणार मोफत धान्य

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

देशातील गरीब जनतेसाठी मोदी सरकराने मोठा निर्णय घेतला आहे. नागरिकांना पुढील चार वर्षे मोफत धान्य सरकार पुरवणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील आज पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोफत धान्य वितरणाची मुदत 4 वर्षांसाठी म्हणजेच 2028 पर्यंत वाढवण्यास मंजुरी देण्यात आली. या बैठकीत इतर अनेक योजनांना



ग्रीन सिग्नल देण्यात आला.

मंत्रिमंडळाने जुलै 2024 ते डिसेंबर 2028 पर्यंत प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना (PMGKAY) आणि इतर कल्याणकारी योजनांतर्गत मोफत तांदळाचा पुरवठा सुरू ठेवण्यास मंजुरी दिली. सरकारच्या या उपक्रमाचा उद्देश विकासाला चालना देणे आणि पोषण सुरक्षा वाढवणे आहे. तसेच गरिबांना मोफत तांदळाचा पुरवठा केल्यास अशक्तपणा आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता दूर होईल, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

सर्वसामान्यांचे आरोग्य लक्षात घेत मोदी सरकारने पोषण सुरक्षा आणि ॲनिमिया मुक्त भारत मोहिमेबाबत मोठा निर्णय घेतला. ॲनिमिया (रक्ताची कमतरता) दूर करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेवर 17,082 कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. केंद्र सरकारने राजस्थान आणि पंजाबच्या सीमावर्ती भागातील रस्त्यांनाही मंजुरी दिली. या भागात 2,280 किमीचे रस्ते बांधले जाणार आहेत. यासाठी 4,406 कोटी रुपये खर्च केले जातील. केंद्रीय मंत्रिमंडळाने गुजरातमधील लोथल येथे राष्ट्रीय सागरी वारसा संकुल (NMHC) विकसित करण्यास मंजुरी दिली. हा प्रकल्प दोन टप्प्यात पूर्ण होणार आहे.

---

## लाडक्या बहिणींना घेऊन येणाऱ्या बसला मांजरोणे घाटात अपघात

प्रतिनिधी
माणगांव

माणगांव येथील लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळ्यासाठी निघालेल्या लाडक्या बहिणींच्या बसला मांजरोणे घाटात अपघात झाला. ब्रेक फेल झाल्याने बस घाटात 40 फूट खाली गेली. या अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

माणगावात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी संपूर्ण रायगड जिल्ह्यासह, पुणे, मुंबई, ठाणे येथून लाडक्या बहिणी बसेसद्वारे दाखल झाल्या होत्या. अशीच माणगांव तालुक्यातील रानवडे येथील लाडक्या



बहिणींना घेऊन येणारी बस दुपारी पावणे एक वाजण्याच्या सुमारास मांजरोणे घाटात सुमारे 40 फूट खाली गेली. ब्रेक फेल झाल्याने बस खाली गेल्याचे समजते. या अपघातात महिला जखमी झाल्या असून एका महिलेच्या पायाला दुखापत झाली असून दुसरी महिला बसच्या खिडकीतून बाहेर फेकली गेली.

संबंधित वृत्त पान 6 वर

## महाराष्ट्रातील 15 जातींचा 'ओबीसी'मध्ये समावेश होणार

### राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचा हिरवा झेंडा


प्रतिनिधी
मुंबई


राज्याच्या ओबीसी प्रवर्गात आरक्षण मिळणाऱ्या परंतु केंद्राच्या ओबीसीच्या यादीमध्ये समावेश नसलेल्या पंधरा जातींसाठी मोठी बातमी आहे. या जातींचा केंद्राच्या यादीमध्ये समावेश होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

इतर मागासवर्गीय प्रवर्गामधील काही जातींचा इतर मागासवर्गीयांच्या केंद्रीय सुचीमध्ये समावेश करण्याची शिफारस राज्य सरकारने राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडे केली होती. या शिफारसीच्या अनुषंगाने राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने सखोल तपासणी करीत आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या निर्देशान्वये इतर मागासवर्गीय जाती/पोटजातींचा केंद्रीय सुचीमध्ये समावेश करण्यास आयोगाने मान्यता दिली आहे.

महाराष्ट्राच्या सुचीतील क. 220 मध्ये अंतर्भाव असलेल्या बडगुजर, सुर्यवंशी गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर आणि रेवा गुजर या जातींचा अन्य मागासवर्गीयांच्या केंद्रीय सुचीमध्ये नव्याने समावेश करण्यास आयोगाने मान्यता दिली तसेच राज्य सुचीच्या क्र. 216 मधील पोवार,

पान 6 वर



## दीपमध्ये बिबट्याचे फोटो व्हायरल; वनविभागाकडून तपास सुरू

**वसई :** शिरसाड-वज्रेश्वरी मार्गावरील चांदीप गावात बिबट्याचे दर्शन झाल्याच्या अफवा समाज माध्यमांवर पसरत आहेत. सोशल मीडियावर मंगळवारपासून बिबट्याचे काही फोटो फिरत आहेत, ज्यामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, वनविभागाच्या तपासानुसार हे फोटो खोटे असल्याचे समोर आले आहे. बुधवारी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी या अफवांबद्दल नागरिकांना सावध करताना असे स्पष्ट केले की, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोंवर विश्वास ठेवू नये. चांदीप परिसरात बिबट्या असल्याची कोणतीही ठोस पुरावे मिळालेले नाहीत. तरीही, गावकरी आणि वन विभागाचे कर्मचारी परिसरात सतर्क आहेत आणि बिबट्याचे ठसे किंवा उपस्थितीची काही चिन्हे आढळण्याच्या शक्यतेवर नजर ठेवून आहेत. तुंगारेश्वर अभयारण्याच्या सानिध्यात असलेल्या या भागात, विशेषत: ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्याच्या काळात, बिबट्याचे वावर पाहिला जातो. मागील काही वर्षांत परिसरातील खर्डी, कोशिंबे आणि कोपर गावांमध्येही बिबट्याचे दर्शन झाल्याच्या घटना नोंदवल्या गेल्या होत्या. त्यामुळे ग्रामस्थांनी अफवांना बळी न पडता, सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.



## थोडक्यात

### मालाड पूर्व येथील दिंडोशी विभागात पाण्याची समस्या

**मुंबई:** मालाड पूर्व येथील प्रभाग ४३ मधील दिंडोशी चाळीच्या ,सोसायटी मध्ये पाण्याची समस्या लोकांना भेडसावते आहे. त्यामुळे ज्या ज्या सोसायटीत, इमारतीत, चाळीत कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे किंवा तुमच्या भागात अजिबात पाणी पुरवठा होत नाही, अशा पदाधिकाऱ्यांना घेऊन माजी नगरसेवक विनोद मिश्रा आज दुपारी १२.३० वाजता पालिकेच्या, मालाड पश्चिम येथील पी उत्तर विभाग कार्यालयात संबधित अधिकाऱ्यांना पाणी समस्या सोडविण्यासाठी निवेदन देणार आहेत. सर्व नागरिकांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपचे रमेश शर्मा यांनी केले आहे.

### युरोपातील नोकरी पडली पावणेआठ लाखांना

**मुंबई:** युरोपमधील मोलदोवा शहरात चांगल्या पगाराची बल्लवाचारी पदाची नोकरी देण्याचे आमिष दाखवून उत्तराखंडमधील तरुणांची पावणेआठ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.उत्तराखंडमधील गडवालचे रहिवासी असलेले मनोहरी बरफु लाल (४८) यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यासह त्यांच्या मित्रांना मुंबईत बोलावून फसवणूक करण्यात आली आहे. यावर्षी १ एप्रिल ते ८ ऑक्टोबर दरम्यान ही फसवणूक झाल्याचा आरोप आहे. याप्रकरणी पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### लाखो रुपयांना विकल्या जाणाऱ्या सापाला जीवदान

**मुंबई:** कफ परेड परिसरातील मेकर टॉवर येथे मांडूळ प्रजातीच्या सापाची तस्करी करुन विक्री करण्यासाठी आलेल्या आंतरराज्यीय टोळीतील चार जणांना कफ परेड पोलीस ठाण्याकडून अटक करण्यात आली आहे.कफ परेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मेकर टॉवरजवळ सोमवारी मांडूळ प्रजातीच्या सापाची विक्री करण्यात येणार असल्याची माहिती कफ परेड पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने मेकर टॉवर परिसरात सापळा रचला होता. प्राप्त माहितीनुसार एका चारचाकी वाहनाची तपासणी केली असता गाडीच्या पाठीमागील बाजूस ठेवलेल्या एका बॅगची तपासणी करताना त्यात ५ किलो वजनाचा व ५५ इंच लांबीचा मांडूळ साप आढळून आला. सापाला 'आरे की फाउंडेशन'चे सर्पमित्र गणेश गायकवाड यांच्या मदतीने ताब्यात घेऊन त्यास वन परिक्षेत्र अधिकारी, वन विभाग ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# विधानसभा निवडणुकीतील सत्तासंघर्ष; नवी आघाडी की राजकीय युती?

प्रतिनिधी
■ वसई

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर वसईतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील बहुजन विकास आघाडी (बविआ) सध्या सत्तेसाठी मोठ्या पेचात अडकली आहे. ठाकूर यांना आपला ३० वर्षांचा राजकीय अनुभव आणि मुत्सद्देगिरी पणाला लावावी लागणार आहे, कारण यावेळी पराभव टाळण्यासाठी त्यांना मजबूत रणनीती आखावी लागेल.

विशेषतः भाजपमध्ये ज्येष्ठ नेते राजीव पाटील यांच्या प्रवेशाच्या चर्चेमुळे वसईतील राजकीय समीकरणे वेगाने बदलत आहेत. राजीव पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यास, बहुजन विकास आघाडीला महाविकास आघाडीसोबत (मविआ) युती करून राजकीय ताकद वाढवावी लागेल. या युतीमुळे वसई, नालासोपारा आणि बोईसर या महत्वाच्या मतदारसंघांमध्ये नवे समीकरण तयार होऊ शकते.

वसईतील ठाकरे गट, काँग्रेस, आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) बहुजन विकास आघाडीशी हातमिळवणी करणार असल्याची चर्चा आहे. जर हे पक्ष एकत्र आले, तर या युतीचे उमेदवार तीनही मतदारसंघांमध्ये मजबूत लढत देऊ शकतील. तथापि, या युतीमुळे महाविकास आघाडीतील इच्छुक उमेदवारांना काहीसा धोका निर्माण होईल, कारण बविआचे नेतृत्व प्रभावी ठरल्यास, त्यांना महत्त्वाची भूमिका मिळण्याची शक्यता आहे.

मुस्लिम आणि ख्रिस्ती समाजाचं मतदान देखील या युतीमुळे प्रभावित होण्याची शक्यता आहे. मागील लोकसभा निवडणुकीत या समाजाने ठाकरे गटाच्या उमेदवाराला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला होता. आता बविआने मविआसोबत युती केल्यास या समाजाचे मत कोणत्या दिशेने जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, राजीव पाटील यांनी अद्याप आपल्या राजकीय भूमिकेचा निर्णय स्पष्ट केलेला नाही. जर भाजपने त्यांना तिकीट दिले नाही, तर त्यांची भूमिका वेगळी होऊ शकते. या परिस्थितीत, बहुजन विकास आघाडीला महाविकास आघाडीत प्रवेश करणे अधिक फायद्याचे ठरेल. या सत्तासंघर्षातून कोणता पक्ष विजयी होईल, हे आगामी विधानसभा निवडणुकीत स्पष्ट होईल, आणि आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या राजकीय कौशल्याची खरी कसोटी लागणार आहे.

# आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते श्री चंडिका मंदिरामध्ये लिफ्टचा शुभारंभ



प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्व जूचंद्र चंद्रपाडा येथील श्री चंडिका देवी मंदिरामध्ये आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याहस्ते उद्वाहक (लिफ्ट) चा शुभारंभ करण्यात आला.

वसई विरार शहर महानगरपालिकेचे माजी सभापती व नगरसेवक कन्हैया भोईर यांच्या वतीने श्री चंडिका मंदिरात बसविलेल्या उद्वाहक (लिफ्ट) चे नुतनीकरण व जास्त भार असलेल्या लिफ्टचा शुभारंभ आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी या कार्यक्रमासाठी माजी महापौर नारायण मानकर, शंकर नारायण महाविद्यालयाचे संस्थापक रोहिदास पाटील.

श्री चंडिका देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष देवेद्र किणी, उपाध्यक्ष विद्याधर पाटील, माजी अध्यक्ष केदारनाथ पाटील, हरिदर पाटील बहूजन विकास आघाडीचे मोरेश्वर पाटील, सुनिल आचोलकर, विश्वजित पाटील, चेतक पाटील तसेच मंदिर ट्रस्टचे इतर पदाधिकारी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसचांलन मनोहर पाटील यांनी केले.

# गोरेगांव, जवाहर नगरमधील विद्या वर्धीनी शाळेची पुनर्बांधणी करा; मनसेची मागणी



प्रतिनिधी
■ मुंबई

जवाहर नगर गोरेगाव पश्चिमेकडील विद्या वर्धिनी संस्था संचलित विद्या मंदिर मराठी माध्यमाच्या शाळेचा विषय कधी मार्गी लागणार? भूखंडाचा श्रीखंड तर होणार नाही ना ? असे प्रश्न स्थानिक नागरिकांना पडलेले आहेत. शासनाने याविषयाची चौकशी करावी.व मराठी माध्यमाची विद्या मंदिर शाळेची पुनर्बांधणी त्याच जागी करण्यात यावी,या संदर्भात मनसेचा पाठपुरावा करीत आहे.

शाळेच्या प्रश्नांसंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेना गोरेगांव विभागाच्यावतीने पत्रव्यवहार करुन नवनिर्वाचित शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांना निवेदन देवून सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मनसे पदाधिकारी राजू साटम, सचिन सावंत, अशोक इंगोले, चिन्नी ग़ोगी, अनिल पाटील, सचिन कांबळे, विनोद घोलप, अनंत सूद(बाबू) उपस्थित होते.

# मुंबईत डेंग्यूचे रुग्ण वाढले

## नऊ महिन्यांत विविध आजारांचे 41 मृत्यू

■ मुंबई

मुंबईत गेल्या सप्टेंबर महिन्यात डेंग्यूच्या रुग्णांचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले आहे. मुंबईत यंदा जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांच्या कालावधीत मलेरियाचे पाच, डेंग्यूचे १२, लेप्टोस्पायरोसिसचे १८, हेपाटायटिसचा एक आणि एच१एन१ चे पाच रुग्ण याप्रमाणे ४१ मृत्यू नोंदले गेले आहेत. डेंग्यू वाढल्याने नागरिकांनीनताप आला असल्यास नजीकच्या पालिका दवाखान्यात, रुग्णालयात तपासणी करावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, मुंबईत सप्टेंबरमध्ये डेंग्यूचे १४५६ रुग्ण नोंदले गेले. गेल्या म्हणजे ऑगस्ट महिन्यात डेंग्यूचे १०१३ रुग्ण पालिका हद्दीत नोंदले गेले होते. गेल्या महिन्याच्या तुलनेत मासिक नोंदीचे हे प्रमाण ६९ टक्के अधिक आहे. पालिका हद्दीत मलेरियाचे रुग्ण ऑगस्टमध्ये ११७१, तर सप्टेंबरमध्ये १२६१ इतके नोंदले गेले. चिकुनगुन्याच्या मासिक रुग्णसंख्येत मात्र घट झाली आहे.

# महामार्गावर धुळीकणांचे लोण; वाहनचालकांचे आरोग्य धोक्यात

प्रतिनिधी
■ वसई

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सध्या जोरात सुरू असून, त्याच्या अयोग्य नियोजनामुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. महामार्गाच्या बाजूने जाणाऱ्या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात धुळीकण उडत असून, याचा वाहनचालकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. नाका-तोंडात धूळ जाऊन अनेक चालकांना घशाचा आणि श्वासाचा त्रास होऊ लागला आहे. विशेषत: दीर्घ पल्ल्याच्या वाहनचालकांना याचा मोठा फटका बसत आहे.



महामार्गावरील व्हाईट टॉपिंगचे काम पावसाळ्याच्या विश्रांतीनंतर पुन्हा सुरू झाले आहे. या कामामुळे महामार्गावर प्रचंड प्रमाणात धूळ निर्माण होत आहे. त्यामुळे महामार्गालगतचे ढाबे, हॉटेल्स, पानटपऱ्या यांनाही मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे, कारण या ठिकाणांना ग्राहकांची गर्दी घटली आहे. महामार्गाच्या १२१ किलोमीटरच्या भागाचे सिमेंट काँक्रीटीकरण केले जात आहे, मात्र त्यातील अयोग्य नियोजन, चुकीची डायव्हर्शन व्यवस्था, आणि निकृष्ट दर्जाचे काम यामुळे वाहनचालक आणि प्रवाशांना गंभीर समस्यांचा सामना करावा लागत आहे. सततच्या धुळीमुळे रस्त्याचे दृश्यही धूसर होत आहे, ज्यामुळे अपघातांची शक्यता वाढत आहे.

महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे चाकरमानी, विद्यार्थी, आणि व्यावसायिक यांना मोठा फटका बसत आहे. वाहनांची संख्याही वाढत असून, मार्गावरील डायव्हर्शन आणि कामाच्या अनियमिततेमुळे वाहतूक सुरळीत होत नाही. यातून निर्माण झालेली कोंडी अनेक तास चालते, ज्यामुळे प्रवासाचा कालावधी मोठ्या प्रमाणात वाढतो.

महामार्गावरील धुळीचे लोट वाहनांच्या गतिशीलतेवर परिणाम करत आहेत. चारचाकी, दुचाकी आणि तीनचाकी वाहनचालक यामुळे त्रस्त असून, त्यांच्या गाड्यांवर मोठ्या प्रमाणात धूळ जमा होत आहे. यामुळे वाहनांच्या देखभालीचा खर्चही वाढत आहे. सर्वसामान्य नागरिक आणि व्यावसायिकांनी या समस्येकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे लक्ष वेधून उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# मनसेत तरुणांची मोठी इनकमिंग; वसईत पक्षाची ताकद वाढली

प्रतिनिधी
■ वसई

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत (मनसे) मोठ्या प्रमाणावर तरुणांचा प्रवेश होत आहे. वसई तालुक्यात शेकडो तरुणांनी मनसेत प्रवेश करून पक्षाला नवा जोम दिला आहे. विशेषतः वसई,विरारमधील साईनगर, बंजारपाडा आणि शिरवली या भागातील तरुणांनी मनसेत प्रवेश केला आहे. या प्रसंगी मनसेचे पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.



सध्या वसईत राजकीय हालचालींना वेग आला आहे. युत्या आणि आघाड्यांच्या माध्यमातून राजकीय पक्षांची ताकद वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, त्याच वेळी मनसेनेदेखील जोरदार पाऊल उचलत आपली संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याचे ठरवले आहे. मनसेकडून मोठ्या प्रमाणावर तरुणांना पक्षात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे, ज्यामुळे वसईत पक्षाची ताकद लक्षणीयरीत्या वाढताना दिसत आहे.

वसईतील मनसे तालुकाध्यक्ष प्रवीण भोईर यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटना विस्तारण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळत असून तरुणांचा मनसेत ओढा वाढला आहे. पालघर जिल्ह्यातील वसई, नालासोपारा, आणि बोईसर या प्रमुख मतदारसंघांवर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी लक्ष केंद्रीत केले आहे आणि त्यासाठी सखोल व्यूहरचना आखली जात आहे.

मनसेकडून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी विशेष रणनिती आखली जात असून, तरुणांची मोठी फळी तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. या तरुणांना राजकारणात सामील करून घेत पक्षाची ताकद वाढवण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. आगामी निवडणुकीत मनसेकडून सर्व मतदारसंघात प्रबळ ताकदीने उतरण्याचे संकेत मिळत आहेत.

# अंधेरी जुहू गल्लीतील एसआरए इमारतीतील 112 घुसखोरांना 10 वर्षांनी बाहेर काढण्यात यश




प्रतिनिधी
■ मुंबई

अंधेरी पश्चिम येथील जुहू गल्ली मधील 'मिलानसार एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेत' गेले दहा वर्षे बेकायदेशीर सदनिका बळकावून ठाण मांडलेल्या ११२ घुसखोरांना सोमवार व मंगळवारी पोलीस बंदोबस्तात बाहेर काढण्यात आले. व ११२ मूळ सदनिकाधारकांना त्यांना त्यांचे हक्काचे घर देण्यात आले. स्थानिक आमदार अमित साटम यांनी घेतलेल्या पुढाकाराने व पोलिसांच्या सहकार्याने या घुसखोरांना बाहेर काढण्यात आले.

या ११२ घुसखोरांना बाहेर काढण्यात मुख्य भूमिका बजावणारे आमदार साटम म्हणाले की, बेकायदेशीर रहिवाशांनी २०१४ च्या सुमारास 'मिलानसर एसआरए कोऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी'ची ११२ घरे बळकावली होती. "स्थानिक राजकीय माफियांचा या बेकायदेशीर कब्जा मागे हात होता. हक्काचे घरमालक बेघर झाले होते आणि त्यांना कोणतीही आर्थिक मदत न करता ते दयनीय परिस्थितीत जगत होते.

आमदार साटम पुढे म्हणाले, बेकायदेशीर घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी एसआरए, पोलीस आणि इतर संबंधित विभागांनी संयुक्तपणे कारवाई केली. सोमवार आणि मंगळवारी बेकायदेशीर रहिवाशांना सदनिकांच्या बाहेर काढल्यानंतर ११२ सदनिका त्यांच्या मूळ मालकांना देण्यात आल्या आहेत.

अनेक वर्षे चाललेल्या या लढ्याबाबत बोलताना आमदार साटम म्हणाले की, कायदेशीर अडथळे आणि नोकरशाहीच्या लालफीतशाही सह अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. तथापि, पीडित कुटुंबासमवेत मी न्याय मागण्यांसाठी संघर्ष सुरू ठेवला. मूळ सदनिका मालकांच्या घराचे स्वप्न या निमित्ताने पूर्ण झाले आहे, या लढ्याचा मला अभिमान वाटतो.

बेकायदेशीर घुसखोरीला बळी पडलेले आफताब अहमद खान यांनी सांगितले की आमचे हक्काचे घर दुसऱ्याने बळकावल्याने आम्ही आमदार साटम यांच्याकडे गेलो. आमचे घर परत मिळवण्यासाठी हस्तक्षेप करण्याची त्यांना मागणी केली होती. त्यानंतर सरकारी पातळीवर गोष्टी पुढे सरकू लागल्या. आमदार साटम यांनी सातत्याने आमची बाजू मांडली आणि अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. आमदार साटम यांच्यामुळे आमचे हक्काचे घर परत मिळाले, असे खान यांनी सांगितले.

# एम एच बी कॉलनीच्या पुनर्वसनाच्या कामामुळे मेघवाडीतील खोल्यांना धोका

प्रतिनिधी
■ मुंबई


जोगेश्वरी पुर्व विभागात सर्वोदय नगर येथे मेघवाडी सुर्योदय सह. गृह. संस्थेची इमारत आहे. त्याच्या शेजारी असलेल्या एम्. एच. बी. काँलनी ह्या वसाहतीचा पुनर्विकास प्रकल्पाचे काम सुरू आहे. त्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम केल्याने तेथे मोठी दरी निर्माण झाली आहे. त्यामुळे मेघवाडी सुर्योदय सोसायटीतील खोल्यांना धोका निर्माण झाला आहे. २५ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे तेथे दरड कोसळून शुभांगी सुरेश गायकवाड व बळीराम गायकवाड यांची घरे कोसळली व घरा खालची माती व पाया खचल्यामुळे घरांना मोठ्या भेगा पडल्या आहेत. आता तेथे राहणे अत्यंत धोकादायक झाले आहे.

सुर्योदय सोसायटी ही प्रकल्प ग्रस्तांसाठी बांधली असुन म्हाडा मुंबई मंडळाने तेथे ३३ रहिवाशांचे पुनर्वसन केलेले आहे. त्यामुळे ह्या रहिवाशांची आर्थिक परिस्थिती फारच बेताची आहे.एम् एच बी काँलनीचा पुनर्विकास प्रकल्पाचे काम काही कारणांमुळे बंद असुन ते प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. त्या मुळे सदर बांधकाम लवकर पुर्ण होणार नाही. तो पर्यंत ह्या रहिवाशांची राहण्याची सोय म्हाडा - मुंबई मंडळाने करावी अशी मागणी शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) केली आहे.

सदर घटना घडली त्या वेळी तेथे तत्काळ स्थानिक माजी नगरसेवक अनंत (बाळा) भि. नरबयांनी भेट देऊन पाहणी केली व म्हाडाचे संबंधित कार्यकारी अभियंता व अधिकारी राठोड यांना कळविण्यात आले. त्यांनी देखिल दखल घेऊन म्हाडाचे अधिकारी कांबळे यांनी २६ सप्टेंबर २०२४ रोजी स्थळ पाहणी केली.

दुर्घटनेत बाधित झालेल्या दोन्ही रहिवाशांची पर्यायी व्यवस्था म्हाडा मुंबई मंडळाने तातडीने करावी अशी मागणी अनंत (बाळा) भि.नर यांनी अधिकाऱ्यांकडे केली आहे.





*मुंबई : मुळचे कोकणातले मुंबईतील आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार शशिकांत पाताडेंच्या मुंबईचे जनजीवन , कोकण कोकणातील निसर्ग , राजस्थान , कोलाज या विषयावर आधारित विविध विषयांवर आधारित एकल कलाप्रदर्शन जहांगिर आर्ट गॅलरीत सोमवारपासून सुरू झालं असून रविवारपर्यंत सर्वांसाठी खुलं आहे .*

# अतिरिक्त पालिका आयुक्त भेट देत नसल्यामुळे माजी नगरसेवक विनोद मिश्रा यांनी केले ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी
■ मुंबई

आपल्या कूरार व्हिलेज विभागात पोस्ट ऑफिस सुरू करण्यासाठी केंद्र सरकारची परवानगी मिळाल्यानंतर पालिकेची परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव देऊनही तो मंजूर होत नाही व पश्चिम उपनगराचे अतिरिक्त आयुक्त फोन करूनही उचलत नाहीत व भेट ही देत नसल्याच्या निषेधार्थ काल स्थानिक माजी नगरसेवक विनोद मिश्रा यांनी पालिका मुख्यालयातील अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन केल्याचा प्रकार घडला.



आंदोलनाच्या या प्रकारानंतर शर्मा यांनी मिश्रा यांना दालनात बोलावून प्रस्तावावर सही करून पालिका आयुक्तांकडे पाठवतो असे मिश्रा यांना सांगितले. त्यानतंर मिश्रा यांनी आपले आंदोलन मागे घेतले.

पालिका अधिकारी मग ते कोणीही असोत.त्यांनी सर्वांना भेट दिली पाहिजे. लोकांना भेट न देणे हे बरोबर नाही. असे भेट न देणारे अधिकारी सरकारची प्रतिमा मलिन करतात म्हणून राज्य सरकारने सर्वसामान्य लोकांनाही भेट देण्याबाबत अधिकाऱ्यांना आदेश द्यायला हवेत अशी मागणी विनोद मिश्रा यांनी केली आहे.

मालाड पूर्व येथील कुरार व्हीलेज मध्ये पालिकेला एमिनिटी प्लॉट सेवा सुविधांसाठी पोस्ट ऑफिस बांधून मिळाले आहे. तेथील लोकसंख्या ८ लाखाच्या आसपास आहे व तिथे साडेतीन लाख मतदार आहेत त्यामुळे या विभागात पोस्ट ऑफिस ची गरज आहे. त्यासाठी केंद्र सरकारची परवानगी मिळाली आहे. पालिकेची परवानगी मिळावी म्हणून पालिकेला प्रस्ताव दिला आहे. पण तो प्रस्ताव ७ सप्टेंबर पासून अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा यांच्याकडे पडून आहे. त्यावर सही करून त्यांनी तो पुढे पाठवला च नव्हता म्हणून विनोद मिश्रा हे त्यांच्याशी संपर्क साधत होते. पण ते त्यांना प्रतिसाद देत नव्हते. म्हणून आपण आज हे आंदोलन केले असे मिश्रा यांनी सांगितले.

सध्या मुंबई महानगर पालिका अस्तित्वात नाही त्यामुळे सुधार समिती व सभागृहाची मंजुरी मिळू शकत नाही. त्यामुळे ११ महिन्याचा करार केला जाणार आहे. दिवाळी पर्यंत पोस्ट ऑफिस सुरू करण्याचा मानस असल्याचे विनोद मिश्रा यांनी सांगितले.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 110**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ११०**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

मुंबई : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी वर्षावास निमित्त बौद्ध भिख्खू धम्मगुरूंना पवित्र कठीण चीवरदान आणि भोजनदान करण्यात आले.यावेळी पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र सरकारच्या वतीने देण्यात आल्याबद्दल बौद्ध उपासक आणि आंबेडकरी  जनते तर्फे केंद्र सरकार चे आभार मानण्यात आले.



# मोदी-शाहांनी महाराष्ट्राला ATM बनवून लुटले; 'प्रचाररथ' लुटीची माहिती पोहचवणार - पटोले

## मोदी-शाहांच्या आदेशाने महाराष्ट्रातील ७.५ लाख कोटी रुपये व ५ लाख रोजगार गुजरातने पळवले

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात आघाडी घेत काँग्रेस पक्षाने भाजपा युती सरकारच्या भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करणारा चित्ररथ बनवला आहे. महाभ्रष्ट युती सरकारने मोदी शाह यांच्या आदेशानुसार गेल्या अडीच वर्षात महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पाठवले आहेत. राज्यातील ७.५ लाख कोटी रुपये व ५ लाख रोजगार गुजरातने पळवले आहेत. नरेंद्र मोदी व अमित शाह यांनी महाराष्ट्राला ATM बनवून कसे लुटले या लुटीची माहिती जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम काँग्रेसचा 'प्रचाररथ' करणार असल्याचे प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.




काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते व विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस पक्षाच्या चित्ररथाचे (प्रचाररथ) उद्घाटन मंत्रालयाजवळील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आले. या कार्यक्रमाला विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश उपाध्यक्ष संजय राठोड, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे, विधी विभागाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. रविप्रकाश जाधव, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्ष युती सरकारने राज्याला लुटले आहे. महाराष्ट्रात येणारी गुंतवणूक गुजरातला पळवली व राज्यातील गुंतवणूक व लाखो तरुणांचे रोजगार हिरावले. मोदी शाह यांच्या आदेशाचे पालन करत एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी महाराष्ट्राला गुजरातकडे गहाण ठेवले ही माहिती जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी अशा प्रकारचे अनेक प्रचार रथ राज्यभर जाऊन जनतेला माहिती देण्याचे काम करतील. गुजरातच्या लाडक्या महाभ्रष्ट युतीच्या गुजरात कनेक्शनचा पर्दाफाश हा प्रचाररथ करेल.

शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केलेल्या विधानावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, हरियाणाची व महाराष्ट्राची परिस्थिती वेगळी आहे. काँग्रेस पक्ष आपल्या मित्र पक्षांना सोबत घेऊन निवडणूक लढवतो हे लोकसभा निवडणुकीत सर्वांनी पाहिले आहे, त्यामुळे काँग्रेसवर काहीही आरोप केलेले सहन केले जाणार नाहीत असा इशारा नाना पटोले यांनी दिला. हरियाणा विधानसभेच्या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस पक्षावर केलेल्या आरोपाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, भाजपाने सत्तेसाठी कोणा कोणा सोबत युती केली हे त्यांनी आधी पहावे. नरेंद्र मोदी जे बोलतात ते गांभिर्याने घेऊ नका, असेही नाना पटोले म्हणाले.

# समूह पुनर्विकास प्रकल्पांच्या माध्यमातून सर्वसामान्यांना मुंबईत उपलब्ध होणार घरे - गृहनिर्माण मंत्री अतुल सावे

## म्हाडा मुंबई मंडळातर्फे २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात



प्रतिनिधी
■ मुंबई

म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या २०३० सदनिकांकरीता सुमारे एक लाख तेरा हजार अर्जदारांचा लाभलेला प्रतिसादावरून मुंबई शरातील परवडणाऱ्या दरातील घरांची वाढती मागणी अधोरेखित होते. मुंबईतील घरांच्या वाढत्या मागणीचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मुंबईचे सीमित भौगोलिक क्षेत्र लक्षात घेता घरांच्या तुटवडयाचा प्रश्न पुनर्विकासाच्या माध्यमातून सोडविता यावा यादृष्टीने राज्य शासनातर्फे पुनर्वसन नियमावली अधिकाधिक सुलभ करण्यावर भर दिला जात असल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी दिले.

समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गृहसाठा निर्माण होऊ शकतो त्याचबरोबर शहरातील पायाभूत सुविधांचे नियोजन देखील सुलभरित्या करता येणार आहे म्हणूनच त्यांत दाटीवाटीने वसलेल्या दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा समूह पुनर्वसन प्रकल्पाचे नियोजन करण्यात येत आहे. त्याचबरोबर बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प व काळाचौकी अभ्युदयनगर वसाहत, जोगेश्वरी येथील पीएमजी प्रकल्पातील इमारतींचा पुनर्विकास तसेच म्हाडा अभिन्यासातील जुन्या वसाहतींच्या पुनर्विकासातून मुंबई शहराला मोठ्या प्रमाणात अतिरिक्त गृहसाठा नजीकच्या भविष्यात निर्माण होणार आहे. याद्वारे सर्वसामान्यांसाठी मुंबईत हक्काची घरे उपलब्ध होणार असून सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मुंबई शहराचे पालकमंत्री दीपक केसरकर व गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत काढण्यात आली. याप्रसंगी सावे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधान मंत्री आवास योजनेच्या माध्यमातून देशातील बेघर कुटुंबांना हक्काचा निवारा देण्याचा संकल्प सिद्धीस नेत आहेत. याच उद्दिष्टांवर शासन कार्यरत असून राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण सक्षम अधिकारी श्रीमती वल्सा नायर-सिंह यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आकार घेत आहे. या गृहनिर्माण धोरणामध्ये परवडणाऱ्या व टिकाऊ घरांच्या उभारणीवर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील प्रत्येक बेघर कुटुंबाला हक्काचा निवारा मिळवून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे  असे सावे यांनी सांगितले. याप्रसंगी गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर- सिंह यांनी म्हाडाच्या नूतन संगणकीय सोडत प्रणालीचे कौतुक करताना सांगितले की, संगणकीय सोडत प्रणाली पूर्णपणे मानवी हस्तक्षेपविरहित करणे हे मोठे आव्हान आहे मात्र हे म्हाडाने शक्य केले आहे. याप्रसंगी सोडतीतील विजेत्या ठरलेल्या अर्जदारांना मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन पत्र यावेळी देण्यात आले. आभार मिलिंद बोरीकर यांनी मानले.



मुंबई : माजी  नगरसेविका प्रिती मनोज सातम यांच्या प्रयत्नाने काल गरजू लोकांना उत्तम आरोग्य मिळावं, नागरिकांच्या आरोग्य तपासण्या व्हाव्यात, त्यांना आवश्यक तो औषध उपचार मिळावा याकरिता आपल्या प्रभाग क्र. ५२ मधील आरे मिल्क कॉलनी युनिट नं. ३२ जैतवन बुद्ध विहार येथे बुधवारी विनामूल्य सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरास विभागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि शिबिराचा लाभ घेतला.

# पोलिसांनी गिरवले मूकबधीरांच्या सांकेतिक भाषेचे धडे

**मुंबई:** दादर रेल्वे स्थानकात रक्तबंबाळ अवस्थेत सापडलेल्या मृतदेहाच्या तपासासाठी पायधुनी पोलिसांना सांकेतिक भाषेचे धडे गिरवावे लागले. मृत अर्शद शेखच्या हत्येतील बहुसंख्य साक्षीदार, आरोपी मूकबधीर असल्यामुळे सांकेतिक भाषा आत्मसात करून पोलिसांनी सुमारे ३०० पानांचे आरोपपत्र तयार केले. त्यात ३१ मूकबधीर साक्षीदारांची साक्ष समाविष्ट करण्यात आली आहे.या हत्या प्रकरणातील मृत व्यक्ती, आरोपी व साक्षीदार सर्वच मूकबधीर असल्यामुळे पोलिसांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. याप्रकरणी सुरुवातीला दुभाषकाची मदत घेण्यात आली. पण पुढे गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलिसांनीच स्वतः मूकबधीर आरोपींची सांकेतिक भाषा शिकण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पोलिसांनी सांकेतिक भाषेच्या अनेक चित्रफीत पाहिल्या. पाच पोलीस पथकांनी अहोरात्र या गुन्ह्याचा तपास करून ३०० पानांचे आरोपपत्र तयार केले.

# पालिकेत अनुकंपा तत्वावर नोकरी देताना जात प्रमाण पत्राची अट शिथिल करावी

## म्युनिसिपल कामगार सेनेची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

शासनाच्या शुद्धिपत्रकानुसार मुंबई महानगरपालिकेत 'जातीचे प्रमाणपत्र' ही अट शिथिल करण्यात यावी तसेच वारसाहक्क व अनुकंपा तत्वावर नोकरी प्रकरणात शासनाच्या तरतुदींचा सकारात्मक दृष्टीने विचार करुन, प्रलंबित नोकरी प्रकरणाचा जलद गतीने निपटारा करावा व " स्वच्छता सैनिकांना" न्याय द्यावा अशी मागणी म्युनिसिपल कामगार.कर्मचारी सेनेचे अध्यक्ष बाबा कदम आणि उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे-बापेरकर - बाबा कदम यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधुन, पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी पालिकेच्यावतीने, "स्वच्छता सैनिकांकरिता वारसाहक्क व अनुकंपा तत्वावर नियुक्ती शिबिर" आयोजित केले आहे. ही शिबिरे २ ते १० ऑक्टोबर २०२४ दरम्यान होत असलेले सदर शिबिर 'घनकचरा व्यवस्थापन खात्याचे' उपायुक्त किरण दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे.

पालिकेच्या झोन १ मधील 'अे', 'बी', 'सी', 'डी' व 'ई' या पाच विभागातील ५ वर्षांपासुनची प्रलंबित वारसाहक्क व अनुकंपा प्रकरणांचा निपटारा करुन अनुसूचित जाती/ जमातींच्या गरीब सफाई कामगारांच्या वारसांना हातोहात नोकरी देणे अपेक्षित होते. जेणेकरुन महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त एक चांगले कार्य मुंबई महापालिकेकडुन होत असल्याचे सिध्द होऊ शकले असते.

तथापि, पालिकेतील काही झारीतील शुक्राचार्य अधिकारी वरील शिबिराचा उद्देश सफल होऊ देत नसल्याचा आरोप "म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम व उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे-बापेरकर यांनी केला आहे.

महाराष्ट्र शासनाने अत्यंत सविस्तर व सुस्पष्ट प्रसारीत केलेल्या संबंधित परिपत्रकातील तरतुदींचा अनेक प्रकारे तर्क-वितर्क लाऊन मंजुर होणाऱ्या नोकरीच्या प्रकरणातील पात्र वारसदारास त्याच्या जातीचे प्रमाणपत्र आणणे, तसेच त्याच्या वडिलांचे 'जात प्रमाणपत्र' आणणे आदी जाचक अटी लावून अनेक पात्र फाईल्स परत मुळ खात्यात पाठविल्या जात असल्याची माहिती डॉ. बापेरकर यांनी दिली. परिपत्रकान्वये वारसा धोरणांतर्गत ज्या ऊमेदवारास नोकरी द्यावयाची आहे त्याचे 'जात प्रमाणपत्र' असतानाही त्याच्या वडिलांच्या जात प्रमाणपत्राची जाचक अट घालण्यात आलेली आहे. जी अट शासनाच्या तसेच पालिकेच्या कामगार विभागाने प्रसारीत केलेल्या परिपत्रकामध्ये कोठेही नमुद नाही, असे पत्रकात म्हटले आहे.



प्रगतीचे खरे माप म्हणजे समाजातील महिलांचा दर्जा होय.



- सावित्रीबाई फुले

वृत्तमानस

मुंबई, गुरुवार, १० ऑक्टोबर २०२४

# भाजपने काँग्रेसचा निकाल लावला

चमत्कारावर अनेकांचा विश्वास नसला तरी हरियाणातील निकाल पाहता त्यावर विश्वास नसणाऱ्यांचाही विश्वास बसेल अशीच परिस्थिती समोर आली आहे. या ठिकाणी ज्या पद्धतीने निकाल लागला त्या पद्धतीवर आता चर्चेचे गुऱ्हाळ सुरू आहे. एका तासात येथील निकालाचाच निकाल लागला असे म्हटले तर ते वाघे ठरणार नाही. कारण ज्या पद्धतीने काँग्रेस पहिल्या सत्रात सर्वच ठिकाणी आघाडीवर चालली होती ती आघाडी काही मिनिटात सर्वच ठिकाणी तुटेल असे कोणालाही वाटले नव्हते. न वाटण्याला कारण हे तसेच असावे. कारण हा काही जादूगराचा चमत्कार नाही तर प्रत्यक्षात एका तासात बाजी पलटल्याचा चमत्कार होता. ही बाजी ज्या पद्धतीने पलटली तिच्याबद्दलच अनेकांच्या मनात संशय आहे. म्हणूनच या प्रकाराला पचवायचे असेल तर चमत्कार घडला असेच म्हणाचे लागेल. जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. या निकालात काँग्रेसला अच्छे दिन येतील असे भाकित सर्वच एक्झिट पोलनी वर्तवले होते, ते भाकित निम्मेच खरे ठरले. नॅशनल कॉन्फरन्सच्या मदतीने जम्मू- काश्मीरमध्ये काँग्रेस सत्तेत परत आली असली, तरी काँग्रेसला हरियाणात मात्र अत्यंत धक्कादायक परिस्थितीचा सामना करावा लागला आहे. सगळ्याच एक्झिट पोलनी हरियाणात काँग्रेसचा एकतर्फी विजय होईल, असे भाकित केले होते. अगदी मतमोजणीच्या दिवशी सकाळी मतमोजणी सुरू झाल्यानंतर 11 वाजेपर्यंत पोस्टल बॅलेट आणि पहिली फेरी होईपर्यंत काँग्रेस 50 ते 55 च्या स्थितीत होती, पण दुपारी बारानंतर परिस्थिती नेमकी उलटी झाली आणि काँग्रेस पराभूत झाली. हरियाणात आश्चर्यकारकरित्या गेल्या वेळेपेक्षाही अधिक जागा घेऊन भारतीय जनता पक्षाने त्या राज्यात तिसऱ्यांदा सत्ता मिळवली आहे. या धक्कादायक निकालाने अनेक राजकीय विश्लेषकही चकीत झाले आहेत. सायंकाळी चार वाजेपर्यंत भारतीय जनता पक्षाला तेथे एकतर्फी यश मिळाल्याचे दाखवले गेले असले, तरी प्रत्यक्ष निकाल जाहीर होईपर्यंत स्थिती स्पष्ट होऊ शकत नाही, असे अनेकांचे म्हणणे पडले. पूर्ण निकाल जाहीर व्हायच्या आधीच पंतप्रधानांनी हरियाणाच्या भाजपच्या मुख्यमंत्र्यांचे फोनवर अभिनंदन करून जवळपास विजयावर शिक्कामोर्तब करून टाकले असले, तरी काँग्रेसच्या गोटातून मात्र वेगळीच शक्यता वर्तवली जात होती. एक तर त्यांचा या निकालावर अजिबात विश्वास नव्हता. मुळात मधल्या दोन-तीन तासांत निवडणूक आयोगाची आकडेवारी अत्यंत धीम्या गतीने जाहीर होत होती. सगळ्या वाहिन्यांचे प्रतिनिधी विविध मतमोजणी केंद्रावर उभे राहून जे इनपुट देत होते, त्यातही काँग्रेसच आघाडीवर असल्याचे दिसत होते. त्यानंतर मात्र सगळ्या वाहिन्यांनी आपल्या रिपोर्टर्सना किंवा त्यांनी दिलेल्या माहितीला स्थान न देता निवडणूक आयोगाच्या आकडेवारी वरच लक्ष केंद्रित केले आणि तिथे भाजप विजयी होत असल्याचे सातत्याने दाखवले गेले. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत प्रत्यक्ष निकालाची स्थिती स्पष्ट झालेली नव्हती. साडेचारच्या सुमाराला एका वाहिनीने हरियाणातील 22 जागांचे प्रत्यक्ष निकाल जाहीर केले त्यात काँग्रेस 13 जागांवर विजयी झाल्याचे नमूद करण्यात आले होते; पण त्यानंतर मात्र त्या वाहिनीन पुढचे अधिकृत निकाल जाहीर करणे थांबवले. हा सगळा प्रकार संशयाला आणि चर्चेला कारणीभूत ठरला. चंदिगडच्या महापौर पदाच्या निवडणुकीत काँग्रेस आणि आम आदमी पक्षाचा उमेदवार स्पष्ट बहुमत मिळवून विजयी झालेला असताना तिथल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने स्वतःच्या हाताने मतपत्रिकांवर फुल्या मारून भाजपच्या उमेदवाराला विजयी घोषित केल्याचे प्रकरण अनेकांनी निदर्शनाला आणून देत हरियाणाच्या निकालावर शेवटपर्यंत शंका व्यक्त केली. अर्थात, असे असले तरी भारतीय जनता पक्षाला तिथे मिळालेला विजय हा त्यांच्या शिरपेचातील मानाचा तुरा आहे. भारतीय जनता पक्ष हरियाणात 100 टक्के पराभूत होणार हे सगळेच राजकीय निरीक्षक गृहीत धरून चालले होते. एवढेच नव्हे तर खुद्द भाजपच्या गोटात निवडणुकीच्या आधी मोठ्या प्रमाणात पळापळ सुरू झाली आणि त्यांचे तब्बल 72 नेते भाजप सोडून काँग्रेस व अन्यत्र गेले, हे सगळे चित्र एकीकडे आणि निवडणुकीचा प्रत्यक्ष निकाल एकीकडे हा विस्मयकारक मामला येथील निकालाच्या दिवशी लोकांच्या पुढे आला. हरियाणातील एकही घटक भाजपला अनुकूल नव्हता, असे चित्र स्पष्ट दिसत असूनही भाजपने तिथे जी बाजी मारली त्याला तोड नाही. हा विजय भाजपने नेमक्या कोणत्या रणनीतीच्या आधारे साकारला याविषयीच्या बाकीच्या बाबी यथावकाश आपल्यापुढे येतीलच; पण या एकूणच निकाल प्रक्रियेच्या विरोधात काँग्रेसने आवाज उठवण्याची तयारी सुरू केली आहे. 'ये लोकतंत्र की नही बल्की भाजपा के इलेक्शन तंत्र की जीत है' अशी प्रतिक्रिया काँग्रेसच्या गोटातून देण्यात आली दुसरीकडे, जम्मू-कश्मीरच्या निवडणुकीत मात्र भारतीय जनता पक्षाला अपेक्षित यश मिळू शकलेले नाही, हा त्यांच्यासाठी मोठा धक्का आहे. कलम 370 रद्द झाल्यानंतर जम्मू- काश्मीर वेगाने विकसित होत असल्याचा दावा भाजपकडून केला जात होता, त्यातून भाजप व मित्र पक्षाला अत्यंत अनुकूल वातावरण असल्याचे भाजपकडून वारंवार सांगितले जात होते. पण तिथले निकाल मात्र भारतीय जनता पक्षाला निराश करणारे ठरले आहेत. जम्मू-काश्मीर या राज्याची भौगोलिक विभागणी काश्मीर खोरे आणि जम्मू अशी आहे. त्यात काश्मीर खोऱ्यात मुस्लीम बहुसंख्य आहेत. तिथे विधानसभेच्या 47 जागा आहेत. त्यापैकी एकही जागा भारतीय जनता पक्षाला जिंकता आली नाही. जम्मू विभाग हा हिंदूबहुल विभाग मानला जातो, तिथे भारतीय जनता पक्ष 370 कलमाविषयीच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर खूप मोठी मजल मारेल असे अपेक्षित होते; जम्मू विभागातील 43 जागांपैकी 29 जागा भारतीय जनता पक्षाला मिळाल्या. पण काश्मीर खोऱ्यात एकही जागा जिंकता न आल्याने हा पक्ष सत्तेपासून दूर राहिला. कलम 370 रद्द करून आपण फार मोठी बाजी मारली असल्याचा जो दावा भाजपकडून केला जात होता तो दावा त्या राज्यातल्या जनतेनेच अमान्य केला आहे, असा संदेश यातून गेला आहे. या दोन्ही राज्यांच्या निकालावर काँग्रेस पक्षाचे भवितव्य आणि पुढील वाटचाल अवलंबून होती त्यांना तिथे संमिश्र यश मिळाले आहे. जम्मू-काश्मिरात नॅशनल कॉन्फरन्सच्या मदतीने काँग्रेसला सत्ता मिळाली असली तरी, त्या यशात नॅशनल कॉन्फरन्सचा सिंहाचा वाटा आहे, हे विसरून चालणार नाही. या संमिश्र निकालने भाजपला बऱ्यापैकी तारले आहे, असा निष्कर्ष आपण आज तरी काढू शकतो. पण हा निष्कर्ष काढता नाही अनेकांच्या मनात सल आहे. हरियाणा मध्ये ज्या पद्धतीचे चित्र निर्माण झाले होते त्या चित्राने भाजप देखील हादरलेला होता. येथील शेतकरी आंदोलनाने आधीच अँटी भाजप वातावरण निर्माण केले होते. त्यातच फोगाट पहिलवान प्रकरणांनी येथील जनता अँटी भाजप झाली आहे असे अनेकांना वाटत होते. मीडियामध्येही तसेच लाईन दिसत होती. अनेकांचा सर्वेही हेच लाईन सांगत होता. म्हणूनच हरियाणा एकतर्फे निकाल देतो आणि तोही काँग्रेसच्या बाजूने असं विरोधकांनी गृहीत धरल्याचे वाटत होते. परंतु ज्या पद्धतीने हा निकाल लागला त्याने या सगळयांच्या शंका कुशकांना पूर्णविराम दिला. अर्थात याला पूर्णविराम म्हणता येणार नाही परंतु काँग्रेस सरकार स्थापन करणार असे सुरुवातीचा निकाल सांगत असताना तासाभराच्या काउंटिंग नंतर मात्र हा निकाल भाजपच्या पारड्यात गेल्याने त्यावर अनेकांना शंका आली. आता या शंकेबाबत पुढील काही दिवस अनेक चर्चासत्रे घडतील. सामान्य जनता हे काही दिवस घडत असलेले चर्चा ऐकून नंतर त्याकडे दुर्लक्ष करेल. हे सगळे घडले गेले तरी येथे भाजप विजयी झाला तो विजय देखील टाळता येणार नाही. त्यामुळे कोणी काही म्हणा भाजपने या राज्यात काँग्रेसचा निकाल लावला हे मात्र नक्की.

# भाजपची विचारपूर्वक रणनीती... हरियाणातील विजयाचे मुख्य कारण

कालच झालेल्या हरियाणातील निवडणुकीत भाजपने नेत्रदीपक विजय मिळविला. ९० संख्येच्या विधानसभेत भाजपने ४८ पर्यंत जागा मिळविल्या. तर प्रतिस्पर्धी काँग्रेस ने ३७ जगावर समाधान मानले. आपला एकही जागा मिळाली नाही तर लोकदलाला तीन जागा मिळाल्या दोन अपक्ष निवडून आले निवडणुकीच्या अगोदर भाजपा विजयी होईल असे अनेकांना वाटत नव्हते . इतकेच काय सर्व एक्झिट पोल नी भाजपाला सत्ता मिळणार नाही असे भाकीत वर्तविले होते. सकाळी निवडणुकीचे निकाल जाहीर होताच काँग्रेस ने मुसंडी मारली . पण काही वेळातच भाजपने जोरदार कम बॅक करत विजयाला गवसणी घातली. या वेळी भाजपाला बंडखोरीची बरीच लागण झाली होती. तथापि त्यांना निवडणुकीत फारसे मतदारांनी जवळ केले नाही. भाजपने उत्तरा खंड मध्ये नेतृत्वाचा बदल केला होता त्याचे चांगले परिणाम त्यावेळी दिसून आले होते . हाच प्रयोग भाजपने हरियाणात केला . हरियाणात भाजपने लोकसभेच्या वेळी मुख्यमंत्री बदलले खट्टर यांच्या ऐवजी सैनी यांना मुख्यमंत्री म्हणून संधी दिली त्याचा चांगला परिणाम मतदारावर झाला.

हरियाणात दोन शेतकरी आंदोलने झाली त्याचा फारसा परिणाम झाला नाही शेतकरी संघटनेचे एक नेते यांना केवळ ११७० मते मिळाली . यावेळी जाट मतदार विरोधी जातील असे चित्र उभे होते . पण त्याचा फारसा विरोध झाला नाही. काँग्रेस ने त्यांच्या काळात दिलेल्या नोकऱ्या व भाजपने त्यांच्या काळात दिलेल्या नोकऱ्या जास्त होत्या त्याचा सकारात्मक परिणाम झाला . या शिवाय मोदी फॅक्टर कामास आला . मोदी शहा नड्डा यांनी अनेक सभा व रोड शो घेतले व प्रचार पिंजून काढला. या शिवाय या निवडणुकीत आप व काँग्रेस यांची आघाडी होऊ शकली नाही. त्याचा परिणाम मतविभागणी त झाला. वास्तविक भाजपाला काँग्रेस पेक्षा केवळ ० .८५ टक्के जास्त मते मिळालेली आहेत पण त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या तब्बल ११ जागा पडल्या.

गेली सुमारे तीन टर्म्स भाजपा सत्तेत आहे . त्यामुळे प्रस्थापित सरकारविरुद्ध जनतेचा मनात रोष होता त्याचा परिणाम होईल कि काय अशी शंका होती पण त्याचा परिणाम दिसून आला नाही. हरियाणात दिनेश फोगट ही ओलीम्पिअन कुस्तीपटू निवड णुकीच्या रिंगणात होती तिचा विजय झाला पण इतर उमेदवारावर त्याचा परिणाम झाला नाही. २०१९ च्या निडणुकीत भाजपाला ४०सीट्स मिळाल्या होत्या. त्यावेळी त्यांनी काही अपक्ष व जेजेपी यांच्या मदतीवर सरकार चालविले होते. यावेळी त्यांना निर्विवाद बहुमत मिळाले २०१४ नंतर प्रथमतः भाजपने बहुमत स्वतःच्या बळावर मिळविले. यावेळी मागासवर्गीय मतदारानी काँग्रेस कडे पाठ फिरविली असे दिसते .काँग्रेस ने भूपेंद्र सिंग हुड्डा यांना पुढे केले पण कुमारी शैलजा यांची नाराजी होती . भाजपने त्यांच्यावर काँग्रेस मध्ये कसा अन्याय होत आहे हे प्रचारात सांगितले त्याचा फायदा भाजपाला झाला. यावेळी भाजपने चार मंत्रासोबत १४ आमदारांचे तिकिट कापले . अनेक नवीन उमेदवार दिले एकूण २३ नवीन उमेदवार दिले काँग्रेस ने अग्निपथ योजनेवर टीका करत प्रचार केला. या उलट भाजपाने. आपली रणनीती बदलली. कॉन्रेस ने शेतकरी, बेकारी व जातीयवाद अशा अनेक मुद्द्यावरून प्रचारात रान उठविले पण मतात त्याचा परिणाम झाला नाही अनेक छोट्या पक्षांनी मते खाल्ली. यावेळी मायावतींनी जादूही दिसली नाही. काँग्रेस मधील गटबाजी, हवेतला प्रचार व विधानसभा निवडणुका वेगळेपण लक्षात घेण्यात आलेले अपयश ही काँग्रेस च्या पराजयाची करणे असू शकतात. त्यांनी निवडणूक आत्मविश्वास पूर्वक लढविली नाही. लोकसभा निवडणुकीतील यशामुळे काँग्रेस हवेतच होती या उलट भाजपने विचार पूर्वक लक्ष दिले .हरियाणातील भाजपच्या विजया मुळे आता यावर्षी होणाऱ्या महाराष्ट्र व झरखड तसेच पुढील वर्षी होणाऱ्या दिल्ली येथील निवडणुकीत भाजपाला मोठा आत्मविश्वास प्राप्त झाला आहे . त्याचा परिणाम त्यांच्या जागा वाढण्यावर निश्चितच होईल .

- शांताराम वाघ,
पुणे

# इस्राईल - पॅलेस्टाइन रक्तरंजित संघर्ष

इस्राईल आणि पॅलेस्टाइन यांच्यात सुरू असलेला रक्तरंजित संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. या युद्धात आता लेबनॉन आणि इराणनेही उडी घेतली आहे. इस्राईलने लेबनॉनवर तर इराणने इस्राईलवर हल्ला केला आहे. इराणने इस्राईलवर २०० हून अधिक क्षेपणास्त्रांचा मारा केला याला प्रतिउत्तर म्हणून इस्राईलने पुन्हा लेबनॉनवर हल्ला करतानाच इराणला देखील बदला घेण्याचा इशारा दिला. इराण आणि पॅलेस्टाईन यांच्यातील संघर्ष वर्षभरानंतरही चालूच आहे. गेले वर्षभर या दोन देशात युद्ध सुरू आहे. पॅलेस्टाईनच्या हमास या दहशतवादी संघटनेने इस्राईल मध्ये घुसून हल्ला केल्यावर इस्राईलने पॅलेस्टाईनच्या गाझा पट्टीवर हल्ला करून ती अक्षरशः जमीनदोस्त केली.

या युद्धात हजारो नागरिक मारले गेले असून लाखो जखमी आहेत तरीही हा संघर्ष सुरूच आहे. इस्राईल पॅलेस्टाईन आणि लेबनॉनवर हल्ले करतच आहे. इस्राईल पॅलेस्टाईन आणि लेबनॉनच्या केवळ लष्करी किंवा दहशतवादी तळांवर हल्ले करीत नसून नागरी वस्तीवर देखील हल्ला करीत आहे. पॅलेस्टाईनच्या हमास संघटनेने देखील इस्राईलवर जो हल्ला केला होता त्यात शेकडो नागरिकांना जीव गमवावा लागला होता. पॅलेस्टाईनने अपहरण केलेल्या शेकडो इस्राईली नागरिकांना अद्यापही सोडले नाही. हा संघर्ष कमी होण्याऐवजी वाढतच चालला आहे नव्हे तो तीव्र होत चालला आहे. अर्थात हा संघर्ष आताचा नाही तर काही दशकांचा आहे. इस्राईल- पॅलेस्टाइन यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाने जग दोन भागात विभागले गेले आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रांससह अनेक मोठ्या राष्ट्रांनी इस्राईलची बाजू घेतली आहे तर मुस्लिम राष्ट्रे पॅलेस्टाइनच्या बाजूने उभी आहेत. भारतातही सोशल मीडियावर आय स्टँड विथ इस्राईल, आय स्टँड विथ पॅलेस्टाइन असे युद्ध रंगले आहे. इस्राईल - पॅलेस्टाइन हा संघर्ष पुन्हा उफाळून येण्यामागे धार्मिक वाद कारणीभूत आहे. जेरुसलेम हे अत्यंत प्राचीन शहर आहे. या शहरात यहुदी, ख्रिश्चन आणि मुस्लिम या तिन्ही धर्मांच्या पवित्र धार्मिक स्थळांचा मिलाफ आहे. साहजिकच या ठिकाणी कोणताही धार्मिक वाद निर्माण झाला तर जगातील निम्म्याहून अधिक देशांवर याचा प्रभाव पडतो. जेरुसलेम या शहराची स्थापना ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्माच्या उदयापूर्वी झाली आहे. ई स पूर्व ९३७ मध्ये यहुदी राजा सुलेमानने येथे भव्य सिनेगॉग ( यहूदिंचे पवित्र धार्मिक स्थळ ) बांधले. कालांतराने या भागावर परकीय आक्रमणे झाली. अनेक धार्मिक क्रांत्या झाल्या आणि त्यांनी सिनेगॉग च्या ठिकाणी आपल्या धर्माची प्रार्थना स्थळे उभारली. मूलनिवासी यहूदिंना तेथून हुसकावून लावले. यहुदी लोक आपली संपत्ती घरदार सोडून जगभरात मिळेल त्या ठिकाणी राहू लागले. या काळात पवित्र सिनेगॉगही नष्ट करण्यात आला.

सध्या त्याची केवळ एक भिंत शिल्लक आहे तिला वेलींग वेल असे म्हणतात. यहुदी लोक तिला अत्यंत पवित्र मानतात. या भिंतीच्या पूर्व दिशेला अल अकसा मशीद आहे. मक्का आणि मदिना प्रमाणेच मुस्लिम लोक या मशिदीला पवित्र मानतात. तर याच शहरात चर्च ऑफ होली स्कप्लचर हे ख्रिश्चन लोकांचे पवित्र स्थान आहे. याच शहरात रोमन सम्राटाने प्रभू येशू ख्रिस्ताला सुळावर चढवले होते. त्यामुळे हे शहर या तिन्ही प्रमुख धर्मासाठी अत्यंत पवित्र असे शहर आहे. त्यामुळे जेरुसलेमवर अधिपत्य स्थापन करणे हा तिन्ही धर्मीयांसाठी प्रतिष्ठेचा मुद्दा बनला आहे. जेरुसलेम हे शहर इस्राईल मध्ये आहे. इस्राईल हा यहुदिंचा म्हणजेच ज्यूंचा देश आहे. इस्राईल हा मध्यपूर्वेतील महत्वाचा देश असून त्याच्या आजूबाजूला सर्व मुस्लिम राष्ट्रे आहेत.

जेरुसलेम शहर आमचेच असून इस्राईलने त्यावर कब्जा केला आहे असा दावा हमास या संघटनेने केला आहे. जेरुसलेमला इस्रायलपासून मुक्त करून तिथे पॅलेस्टाइन राष्ट्र निर्माण करणे हे या संघटनेचे ध्येय आहे. तर हमास ही दहशतवादी संघटना असून तिला आमच्या देशात जागा नाही जर हमासने आमची खोड काढली तर त्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असे इस्रायलचे धोरण आहे त्यामुळेच कित्येक दशके हा संघर्ष सुरु आहे. यावेळी मात्र या संघर्षाने उग्र स्वरूप धारण केले आहे हा संघर्ष जर लवकर मिटला नाही तर त्याची मोठी किंमत जगाला मोजावी लागेल. या संघर्षाला धार्मिक किनार असल्याने हा संघर्ष धार्मिक युद्धाचे रूप घेऊ शकतो म्हणूनच हा संघर्ष वेळीच मिटला पाहिजे त्यासाठी जगातील मोठ्या राष्ट्रांनी मध्यस्थता करायला हवी.

- श्याम ठाणेदार,
पुणे

## पत्र मानस

### निकाल म्हणजे इंडिया आघाडी नापास

हरियाणा राज्यात इंडिया आघाडीची सत्ता नक्की येईल असाच जवळपास सर्वच एक्झिट पोलने छाती ठोकून सांगितले होते आणि झाले काय तर नेमके त्याउलट म्हणजे हरियाणात सलग तिसऱ्यांदा भाजप सत्तेवर येत आहे. याआधी सुद्धा लोकसभेच्या वेळी एक्झिट पोलने भाजपा अबकी बार चारसो पार आणि त्यांच्या सुरात सुर मिसळून भाजपावाले देखील खात्रीने सांगत होते पण झाले काय जनतेने जागा दाखविली सत्ता मिळाली पण कशीबशी. पण कालच्या हरियाणा विधानसभेच्या निकालामुळे राज्यात मविआ मध्ये सीएम पदावरील काँग्रेसचा दावा आता कमजोर ठरला असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा मुख्यमंत्री होण्याची शक्यता मात्र वाढलेली आहे. राज्यात महायुती भक्कम आहे असे चित्र अजून तरी दिसत आहे त्यामुळे हरियाणा विधानसभेचा निकाल म्हणजे इंडिया आघाडी पुन्हा एकदा स्पेशल नापास झालेली आहे असेच वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### नवरात्रोत्सव दिवसात महावितरणचा दांडिया

नवरात्रोत्सव महाराष्ट्रात सुरू आहे.रात्री रास गर्बा देवीच्या मंडपात होतो.सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण होते. मात्र राजापूर तालुक्यातील नाणार गावातील वीज सोमवारी रात्री पावणे आठ वाजता गेली ती पूर्ववत करण्यास राजापूर महावितरण कंपनीला एकवीस तास लागले.वीज आली सर्व खूष झाले.पुन्हा दोन तासाने गेली ती पंधरा तासाने आली.त्यानंतरही येणे जाणे सुरुच आहे.राजापूर महावितरण कंपनीने वीज पूर्ववत केली त्याबद्दल आभार मानणे आवश्यक आहे.महाराष्ट्र राज्याचे उर्जा मंत्री महोदय कोकणातील वारंवार बत्ती गुल का होते याचा आढावा घेऊन कायम स्वरूप तोडगा काढतील तर त्यांचे उपकार होतील. कारण वीज जवळपास जीवनातील अविभाज्य भाग झाली आहे. पाण्याचे पंप,मोबाईल चार्जिंग, घरातील वीजेवरील उपकरणे यांचा श्वास वीज आहे. कोकणातील लोक वीज चोरी करीत नाहीत आलेले विजेचे बिल निमुटपणे भरतात. उर्जा मंत्र्यांनी आपल्या खात्याच्या कारभारात विशेष लक्ष द्यावे आणि कोकणातील विजेचा लपंडाव थांबवावा.सणासुदीच्या दिवसात वीज केल्यावर काय परिस्थिती होते हे नव्याने सांगण्याची गरज नाही.येणारे सर्व सण विजेच्या रोषणाई उजळून जातील असे मानू या .

**- महादेव गोळवसकर, कुर्ला**

### रेपो रेट मध्ये बदल अपेक्षित

मे महिन्यात ४.८ टक्क्यांवर असणारा महागाईचा दर जून महिन्यात ५.१ टक्क्यांवर गेला तरही रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सलग दहाव्यांदा रेपो रेट ६.५ टक्यांवरच कायम ठेवला आहे. देशातील आर्थिक स्थिती, महागाईचा दर आणि इतर आर्थिक घटकांच्या पार्श्वभूमीवर व्याजदरांबाबत निर्णय होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. बाजारपेठेतील घडामोडींचा परिणाम आरबीआयच्या व्याजदर पतधोरणावर होत असतो. महागाईचा दर ४ टक्क्यांच्या आत आणल्यानंतर रेपो रेट मध्ये बदल करणार का? त्यासाठी मोठा पल्ला गाठावा लागणार आहे. आरबीआय गेल्या १८ महिन्यांपासून व्याजदरांमध्ये कोणतेही बदल करण्याचे धाडस करीत नाही. भारतीय अर्थव्यवस्थेने जोमाने वाटचाल करत असून विकास दर वाढत असताना रेपो रटे मध्ये बदल अपेक्षित होते. रेपो रेट कमी झाल्याने बँकांच्या माध्यमातून ग्राहकांना मिळणारी कर्ज कमी व्याजदरावर उपलब्ध होतात. कर्जावरील व्याजदर कपातीचा ग्राहकांना दिलासा मिळावा.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### सर्वार्थाने योग्य निवड

डॉ तारा भवाळकर यांची ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड सर्वार्थाने योग्य आहे. डॉ तारा भवाळकर यांनी त्यांचं सबंध आयुष्य लोकसाहित्याच्या अध्ययन, चिंतन, संशोधन आणि लेखनासाठी समर्पित केलं आहे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, मराठी भाषा आणि साहित्य, नाट्यपरंपरा अशा विविध विषयांत त्यांनी मोलाची भर घातली आहे. ललित लेखन, अनुवाद, व्याख्याने, आकाशवाणीसाठी लेखन, यांसह मराठी विश्वकोश, समाजविज्ञान कोश, मराठी वाङ्मयकोश, आणि ग्रंथकोश यातील अनेक महत्त्वाच्या नोंदी त्यांनी लिहिल्या आहेत. भारतीय संस्कृतीतील स्त्री प्रतिमांचा धांडोळा आणि स्त्री मनाचा शोध त्यांनी आवर्जून घेतला. लोकसाहित्याची स्त्रीवादी समीक्षा प्रस्थापित करण्यात डॉ तारा भवाळकर यांची महत्वाची भूमिका राहिली आहे. डॉ तारा भवाळकर यांचे मनापासून अभिनंदन!

**- श्याम ठाणेदार, पुणे**

### इमारती पाडण्यापूर्वी रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात यावे

नालासोपारा पूर्वेकडील अग्रवाल नगरी येथे बोगस कागदपत्रे तयार करून २०१० ते २०१२ या कालावधीत विकासकाने ४१ इमारतींचे बांधकाम केले. माजी नगरसेवक सीताराम गुप्ता व अरूण गुप्ता यांनी २००६ मध्ये क्षेपणभूमी आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठीची आरक्षित असलेली जमीन बळकावण्यात आली. बांधकाम तयार करण्यात आलेल्या इमारतीतील घरे विकण्यातही आली. विशेष म्हणजे घराच्या विक्री करारनाम्याची नोंदणी निबंधक कार्यालयात करण्यात आली. या गौडबंगाल प्रकरणात माजी नगरसेवक सीताराम गुप्ता व अरूण गुप्ता यांना ताब्यात घेऊन यांच्यावर जागेची व घरांची विक्री केल्याच्या फसवणुकीबद्दल कारवाई करण्यात यावी. घर खरेदी केलेल्या रहिवाशांची सोय करायला हवी. प्रथम त्यांच्या पुनर्वसनाचा विचार झाला पाहिजे. नंतरच इमारती पाडण्याची कारवाई करण्यात यावी. यात अनेक मासे गळाला सापडतील. भ्रष्टाचारावर रितसर कारवाई झाली पाहिजे.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर. अंधेरी.**

### हरयाणा निवडणूकीतून बोध घ्यावा.

नुकतेच हरयाणा व जम्मू काश्मीर विधानसभांचे निकाल लागले असून तेथे भाजप व नॅशनल कॉन्फरन्स यांची सत्ता स्थापन होणार आहे. साहजिकच या निकालामुळे भाजपचा आत्मविश्वास प्रचंड वाढल्याचे स्पष्ट दिसते. तरीही त्यांनी हुरळून जाऊ नये. तर काँग्रेसने हा निकाल अमान्य केल्याचे समजते. वास्तविक पाहता हरयाणात भाजपचा पराभव होण्याचे संकेत सर्वच थरातून मिळाले असताना काँग्रेसच्या अतिआत्मविश्वासाने त्यांचा घात झाला. तेथे जातीच्या समि करणाने काँग्रेसचा विजय हिरावून घेतला. त्याचप्रमाणे अंतर्गत वादाचीही किनार त्याला असल्याचे स्पष्ट होते. एकाच नेत्याच्या खांद्यावर ओझे पडल्याने त्याला ते झेपले नाही. प्रत्येक निवडणूक ही वेगळी असते. त्याचप्रमाणे प्रत्येक राज्याची समीकरणे व समस्या भिन्न असल्याने एका राज्यातील यश दुसऱ्या राज्यात मिळेलच असे नाही, किंबहुना ते गृहीतही धरू नये. या निकालातून अनेकदा शिकण्यासारखे बरेच धडे मिळत असतात. अर्थात ते सूचक असतात असेच म्हणावेसे वाटते. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती या सर्वांपेक्षा भिन्न असल्याने भाजपला शंभर टक्के यश मिळेलच याची खात्री नाही. म्हणूनच त्यांना पराभवाची भीती वाटते. हरयाणा प्रमाणे महाराष्ट्रातही लोकसभेला भाजपला अपयशाची चव चाखावी लागल्याने ते सावध होते. त्यांनी विविध घटकांना खुश करणे, जातीय ध्रुवीकरण करणे, विरोधकांच्या आरोपांचे खंडन करणे, मतदारांना विविध प्रलोभने दाखवून खुश ठेवणे तसेच विरोधकांना केंद्रीय यंत्रणांच्या जाळयात अडकवून त्यांचे राजकीय खच्चीकरण करताना प्रचंड जाहिरात बाजी करून जनतेला आपल्या बाजूने ठेवण्याचा प्रयत्न होत आहे. त्यातच संघाचे प्रचारक मैदानात उतरल्याचे चित्र असून, सरसंघचालकांच्या हिंदूंना साद घालण्याच्या कृतीतून याचा प्रत्यय येतो. केंद्रातील बडे नेते तर महाराष्ट्रात दौऱ्यावर दौरे करून संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढीत आहेत. एकाने तर अगोदरच विरोधकांना फोडा व आपल्या पक्षात जोडा असा मूलमंत्र दिला आहे. यावरून महाराष्ट्र व झारखंड यांच्या निवडणुका हरियाणा सोबत का घेतल्या नाहीत या मागची खेळी आता कळून चुकली आहे. सध्या महाराष्ट्रात मराठा, ओबीसी, धनगर व आदिवासी समाजात प्रचंड असंतोष असल्याने त्याचा अचूक फायदा घेण्याची भाजपची रणनीती असून त्याला संघाचे पाठबळ आहे. त्यामुळे संविधान वाचविण्यासाठी दलितांनी गंभीरपणे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. कारण येत्या संविधान दिनापूर्वी त्यांनाही गोंजारण्याचा निश्चित प्रयत्न होईल. निवडणूक आयोगाची एकूणच वर्तणूक पाहता, जनता संशयाने पाहत असल्याने त्यांचीही अप्रत्यक्षपणे मदत भाजपला मिळणार यात शंका नाही. परिणामी राज्यातील महायुतीचा कारभार लक्षात घेता महाराष्ट्रधर्म, मराठी अस्मिता,मराठी बाणा व कोविडचा काळ यांचा विचार मतदारांनी करावा. त्यामुळे हरयाणातील यशाने भाजपने हुरळून जाऊ नये, तसेच महाविकास आघाडीने याचा बोध घ्यावा असे वाटते.

**- पांडुरंग भाबल, भांडुप.**

## उत्सवांच्या काळात सुरक्षेसाठी साध्या वेशातील पोलीसांची गस्त

**ठाणे :** येत्या काही दिवसांत दसरा आणि दिवाळी निमित्ताने महिलावर्ग मोठ्याप्रमाणात खरेदीसाठी बाहेर पडणार आहे. या कालावधीत महिलांची छेडछाड किंवा गैरप्रकार टाळण्यासाठी साध्या वेशातील महिला पोलिसांची गस्त ठेवली जाणार असल्याची माहिती ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी दिली. राज्यात सण उत्सवांना सुरूवात झाली आहे. मागील काही महिन्यांपासून राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दसरा सणानिमित्ताने ठाणे बाजारपेठेत तसेच आयुक्तालय क्षेत्रातील विविध मुख्य बाजारपेठेत महिला खरेदीसाठी बाहेर पडतील. दिवाळी निमित्तानेही मॉल तसेच बाजारपेठेत तरुणी खरेदीसाठी जातात. त्यामुळे अशा गर्दीच्या ठिकाणी साध्या वेशातील महिला पोलीस, दामिनी पथक, निर्भया पथकांची गस्ती सुरू ठेवण्याची माहिती डुंबरे यांनी दिली. सण उत्सवांच्या कालावधीत कोणत्याही धर्माच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्यावी आणि हे सण उत्सव आनंदाने साजरे करावेत असे आवाहनही त्यांनी केले.



# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायमस्वरुपी सुरु राहणार - मुख्यमंत्री शिंदे

## रायगडमध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना राज्यस्तरीय वचनपूर्ती सोहळा उत्साहात

प्रतिनिधी
■ माणगाव

रायगड जिमाका दि. 9- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी व क्रांतिकारी योजना आहे. ही योजना लाडक्या बहिणींसाठी कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. या योजनेसाठी 46 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सद्यस्थितीत असणारी दरमहा 1 हजार 500 रुपयांची रक्कम वाढवत जाऊन टप्प्याटप्प्याने ही रक्कम तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींना आज राज्यस्तरीय वचनपूर्ती कार्यक्रमात दिली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय वचनपूर्ती कार्यक्रमाचे रायगड जिल्ह्यातील मोर्बा येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री तथा पालकमंत्री रायगड जिल्हा उदय सामंत, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग पहिवहन महामंडळ,भरत गोगावले, अध्यक्ष स्थायी समिती, पेट्रोलियम व नॅचरल गॅस मंत्रालय, भारत सरकार सुनिल तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, सचिव, महिला व बाल विकास विभाग डॉ.अनुपकुमार यादव, विभागीय आयुक्त कोकण डॉ.राजेश देशमुख, आयुक्त महिला व बाल विकास विभाग डॉ.प्रशांत नारनवरे, आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना डॉ.कैलास



पगारे,जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका पनवेल मंगेश चितळे आदी उपस्थित होते.

महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावे हीच भाऊ म्हणून प्रामाणिक इच्छा आहे आणि म्हणूनच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये माहेरचा आहेर मिळणार आहे, हा आहेर थांबणार नाही असे भावनिक आश्वासन देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेने सर्व रेकॉर्ड मोडले आहेत. ही योजना सुपरहिट असून दिवाळीपूर्वीच महिलांना भाऊबीज देण्यात आली आहे. आज सर्व महिला भगिनीच्या खात्यात ऑक्टोबर व नोव्हेंबर चे पैसे जमा झाले आहेत. आज राज्यातील महिलांच्या खात्यात 17 हजार 200 कोटी रुपये जमा केले आहेत.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, माझी महिला भगिनी कष्ट करते, कुटुंबासाठी राबते याची आम्हाला जाणीव आहे, अशा कष्टकरी बहिणींसाठी ही योजना सुरु करण्यात आली असून आतापर्यंत राज्यात 2 कोटी 26 लाखहुन अधिक बहिणींच्या खात्यात रक्कम जमा झाली आहे.

# मंत्रालयात नोकरीच्या आमिषानं गंडवलं

## बनावट नियुक्तीपत्र देणारे जोडपे अटकेत

प्रतिनिधी
■ ठाणे



मंत्रालयात लिपिक पदासाठी नोकरीचे आमिष दाखवून 4 लाख 20 रुपयांची फसवणूक करणाऱ्या कासारे दांपत्यास भाईंदर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. तर यामधील मुख्य आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफ्फुल वाघ यांनी दिली.

सध्या सरकारी नोकरी, म्हाडामध्ये घर देतो, असे फसवणुकीचे अनेक प्रकार समोर येत आहेत.अशीच एक घटना भाईंदर पश्चिमेला राहणाऱ्या निकी भोईर यांना नोकरीचं अमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आली. भाईंदर पोलिसांनी या प्रकरणी तक्रार दाखल करून कासारे दांपत्यास अटक केली. या प्रकरणातील मुख्य आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

आरोपी प्रीती कासारे ही बोरिवली येथे इव्हेंट मॅनेजमेंटचं काम करते. येथं प्रीतीची एका व्यक्तीशी ओळख झाली. प्रीतीनं त्यांना सांगितलं की, मंत्रालयात लिपिक पदाची नोकरी कोणाला हवी असल्यास मला संपर्क करा, मी त्याचं काम करून देईन. तुम्हाला देखील त्यातून थोडी आर्थिक मदत होईल. अशाप्रकारे कासारे दांपत्यानं आणि फरार असलेल्या आरोपीनं निकी भोईर यांना नोकरीचं आमिष दाखवून 4 लाख 20 हजार रुपये घेतले. पैसे घेतल्यानंतर या दांपत्याकडून आणि फरार आरोपीकडून निकी भोईर यांना उडवा उडवीची उत्तर मिळत होती. निकी भोईर यांना बोगस लिपिक पदावर आपली नियुक्ती झाल्याचं पत्र देखील देण्यात आलं. मात्र, ते बोगस असल्याचं निष्पन्न झालं. त्यानंतर तक्रारदार निकी भोईर यांना संशय आल्यानं त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.भाईंदर पोलिसांनी या प्रकरणाचं गांभीर्य ओळखून कासारे दांपत्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. फरार आरोपीनं अनेकांची फसवणूक केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केलाय.

# नायझेरियनकडून 25 लाखांचे अमली पदार्थ जप्त

प्रतिनिधी
■ नवी मुंबई



ड्रग्स विक्री करणाऱ्या नायझेरियन व्यक्तीवर अमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई केली आहे. त्याच्याकडून २५ लाख ४३ हजाराचे अमली पदार्थ हस्तगत करण्यात आले आहेत. तळोजा येथे भाड्याने घेतलेल्या घरात तो अमली पदार्थ विक्री करायचा.

तळोजा परिसरात एक नायझेरियन व्यक्ती अमली पदार्थ विक्री करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यावरून सहायक आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी वरिष्ठ निरीक्षक संदीप निगडे, सहायक निरीक्षक श्रीकांत नायडू, निलेश धुमाळ, ज्ञानेश्वर बनकर, वीय पाटील,, रमेश तायडे, गणेश पवार, संजय फुलकर, अंकुश म्हात्रे आदींचे पथक केले होते. या पथकाने मंगळवारी तळोजा एकटपाडा येथील आय.जी. रेसिडेन्सी इमारतीमधील घरावर छापा टाकला. यावेळी तिथे राहणाऱ्या इफियानी इयादा (४३) याच्याकडे ३ लाख २३ हजाराचे २१.१६ ग्रॅम एमडी व २१ लाख २० हजाराचे १०६.७४ ग्रॅम कोकेन मिळून आले. सदर ठिकाणी विदेशी नागरिकाला भाड्याच्या घरात आश्रय दिल्याची माहिती घरमालक व एजंट यांनी पोलिसांपासून लपवली होती. याप्रकरणी त्या दोघांवर देखील तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला जाणार आहे.

# आवक वाढूनही दर्जा खालावल्याने भाज्या महाग

■ नवी मुंबई

मागील आठवड्यात पडलेल्या पावसाचा भाज्यांच्या दर्जावर परिणाम होत आहे. भिजल्याने भाज्या खराब होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे एपीएमसी बाजारात आवक वाढूनही भाज्यांच्या दरात वाढ होत आहे.

राज्यसह नवी मुंबई, मुंबई उपनगरात मागील आठवड्यात पडलेल्या पावसाने भाज्यांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. वाशीतील भाजीपाला बाजारात भाज्यांची १००-१५० गाड्यांची आवक वाढली असून ७१२ गाड्या दाखल झाल्या होत्या. परंतु यामध्ये मोठ्या प्रमाणावर भिजलेल्या भाज्या दाखल होत आहेत. त्यामुळे भाज्यांचा दर्जा घसरत आहे. वाटाणा, फरसबी, टोमॅटो, आणि मेथीच्या दरात वाढ झाली आहे तर शिमला आणि हिरवी मिरचीच्या दरात घसरण झाली आहे.

फरसबी अवघी ८ क्विंटल तर वाटाणा २४८ क्विंटल , टोमॅटो २०३३क्विंटल, मेथी २८३००क्विंटल दाखल झाली आहे. मुंबई कृषी उत्पन्न भाजीपाला बाजारात भाज्यांची १००-१५०गाड्यांची आवक वाढलेली आहे. परंतु पावसामुळे भाज्या खराब झाल्याने शेत मालाची प्रत घसरल्याने काही भाज्यांच्या दरामध्ये वाढ झाली आहे, अशी माहिती एपीएमसीमधील घाऊक व्यापारी बाळासाहेब बडदे यांनी दिली.

**पश्चिम रेल्वे**
**शुद्धिपत्रक**
निविदा सूचना क्र: ईएल-टीआरडी-डब्ल्यू-११८-२४-२५-११ दिनांकित ०९.१०.२०२४.
उघडण्याचा दिनांक ०९.१०.२०२४ (१५:३० वा.) च्या ऐवजी ३०.१०.२०२४ (१५:३० वा.) असा बदलण्यात आला आहे. निविदेच्या सर्व अन्य अटी पूर्वीप्रमाणेच राहतील.
०६१६
आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**पश्चिम रेल्वे**
**तातडीचे दुरुस्ती काम**
वरी. डीईएन (दक्षिण), पश्चिम रेल्वे, मुंबई सेन्ट्रल, मुंबई ४००००८ निविदा सूचना क्र. बीसीटी/२४-२५/१८४, दिनांक: ०३.१०.२०२४ मागवित आहेत. काम आणि ठिकाण: चर्चगेट – विरार अनुभाग: एडीईएन (टी/एस) पीएल अनुभागाच्या अंतर्गत मुंबई सेन्ट्रल मेन आणि वांद्रे टर्मिनस येथे सीसी अप्रोन ची तातडीची दुरुस्ती. कामाचे अंदाजे मूल्य: रु. ६०,४४,०७२.१४. इरठे: रु. १,२०,९००/- सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ : २९.१०.२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत उघडण्याचा दिनांक आणि वेळ : २९.१०.२०२४ रोजी १५.३० वा. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.
०६०३
आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**जाहिर सुचना**

**विषय:** अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था/ खाजगी कंपनी मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहिर सुचना.

सदर सुचनेद्वारे नोंदणीकृत सर्व अनुभवी अशासकीय संस्थांना/ खाजगी कंपनीना कळविण्यात येते की, बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या इच्छुक धर्मादाय आयुक्त व बृहन्मुंबई महानगर पालिकेत नोंदणीकृत असलेल्या अनुभवी अशासकीय संस्था, मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था व खाजगी कंपनी या संस्थांकडून / कंपनीकडून मंजुरी मिळाल्याच्या पुढच्या सहा महिन्याच्या कालावधीकरिता अतिक्रमण निर्मूलन वाहनांवर एकूण ०६ कंत्राटी कामगार पुरविण्याकरिता मोहरबंद इच्छापत्र मागविण्यात येत आहे.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरीक्षण अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मूलन ), बृहन्मुंबई महानगर पालिका एफ / दक्षिण विभाग कार्यालय, पहिला मजला, खोली क्र. १, डॉ. आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई - ४०००१२, येथे रु. ३३००/- अधिक १८% वस्तू व सेवा कर असे एकूण रुपये ३८९४/-(छाननी शुल्क)आकारून (ना परतावा) रोख स्वरूपात चलन काढून दि. १०/१०/२०२४ ते दि. १४/१०/२०२४ या दिवशी सकाळी १०.३० ते ०९.०० वाजेपर्यंत विकत घेऊ शकतात तसेच आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज दि. १४/१०/२०२४ पर्यंत दुपारी ०१.०० वाजेपर्यंत अनुज्ञापन खाते एफ / दक्षिण विभाग येथे पहिला मजला येथे सिलबंद पेटीत टाकावे. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

लॉटरी तारीख दि.१५/१०/२०२४ रोजी दुपारी ०२ वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

पीआरओ/१६३५/जाही/२०२४-२५
कोणताही ताप असू शकतो हिवताप.

सही/-
सहाय्यक आयुक्त, एफ/
दक्षिण विभाग

# सक्षम भगिनी योजने अंतर्गत 1500 महिला बचत गटांचे प्रशिक्षण शिबीर



प्रतिनिधी
■ डोंबिवली

कुटुंबातील महिला सक्षम झाली, तरच संपूर्ण कुटुंब सक्षम होते. त्यामुळे देशातील प्रत्येक महिला भगिनी सक्षम झाली पाहिजे. हेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी सक्षम भगिनी योजना सुरु करण्यात आली आहे. आमदार व सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने डोंबिवली येथे या योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

"वेगवेगळ्या ठिकाणी आपल्या प्रॉडक्ट्सची फ्रेंचायजी देणाऱ्या 'पासो फुड्स' या कंपनीशी आम्ही चर्चा केली. महाराष्ट्रामध्ये त्यांच्या व्यवसायाचा विस्तार वाढवण्यासाठी मार्केट उपलब्ध करून देऊ, असे सांगितले. त्यानुसार केएसआर उद्योग समूह आणि पासो फुड्स यांच्या संयुक्त विद्यमाने सक्षम भगिनी योजना राबवण्यात येणार आहे." असे मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले.

सक्षम भगिनी योजनेबाबत डोंबिवलीतील १५०० महिला बचत गटांचे प्रशिक्षण शिबीर नमो रमो नवरात्री या मंडपामध्ये घेण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरामध्ये पासो कंपनीसोबत थेट अग्रीमेंट कसे करावे, स्वीगी, झोमॅटो या कंपन्यांसोबत टाय अप करून घरबसल्या महिन्याला १५ ते २० हजार रुपये कसे कमावता येतील याचे प्रशिक्षण बचत गटांना देण्यात आले. १० असे खाद्यपदार्थ फ्रिजमध्ये ठेऊन त्यांची ग्राहकांना डिलिव्हरी कशी करता येईल. अशा सर्व गोष्टींचे मार्गदर्शन देखील देण्यात आले. १५०० बचत गटांमधील अधिकांश बचत गटांनी आम्हाला हे काम प्राधान्याने करायचे असल्याचे ते म्हणाले.

या योजनेमधील प्रमुख फायदा म्हणजे यासाठी बचतगटांना कोणतीही गुंतवणूक करायची गरज नाही. तसेच फ्रेंचायजी घेण्यासाठी सुद्धा एकही पैसा खर्च करण्याची गरज नाही. या योजनेत महिलांना एक रुपयाही खर्च न करता, घरबसल्या आणि आपल्या सवडीनुसार काम करून स्वतःच्या पायावर उभे राहता येणार आहे.

# महाराष्ट्र भवनचे भूमिपूजन शुक्रवारी

■ नवी मुंबई

नवी मुंबईत महाराष्ट्र राज्य वगळता विविध राज्यांची भवने दिमाखात उभी आहेत. जवळजवळ १५ वर्षांपासून कागदावरच सीमित राहिलेला महाराष्ट्र भवनचा प्रकल्प अखेर मार्गी लागणार असून येत्या शुक्रवारी वाशी येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मान्यवरांच्या उपस्थितीत महाराष्ट्र भवनाचे भूमिपूजन होणार असल्याची माहिती सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांनी दिली. मागील अनेक वर्षांपासून शहरात राज्यातील नागरिकांसाठी नवी मुंबईत हक्काचे एक ठिकाण असावे असा प्रयत्न विविध पातळीवर झाला. आ. मंदा म्हात्रे यांच्यासह विविध घटकांनी व पक्षांनी यासाठी पाठपुरावा केला असून सिडकोने या प्रकल्पाच्या दृष्टीने कार्यवाही सुरू केली. वाशी सेक्टर ३० ए येथील सुमारे आठ हजार चौरस मीटर भूखंडावरील प्रस्तावित महाराष्ट्र भवनच्या उभारणीसाठी १२१ कोटी रुपये खर्च केला जाणार आहे. सिडकोने विविध राज्यांच्या भवनांसाठी वाशी परिसरात भूखंड दिले आहेत.

**पश्चिम रेल्वे**
**बांधकाम कामे**
सिनी. डीएसटीई/ उत्तर/ मुंबई सेंट्रल, २रा मजला, विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४००००८ हे मागवित आहेत, **अनु क्र. : १. ई-निविदा सूचना क्र. : एसजी_१४१_१_६६_डीएफसीसी_ईआय_क्योसान. दि. ०७.१०.२०२४. काम आणि ठिकाण :** मुंबई विभागाच्या विरार - सुरत सेक्शन दरम्यान विविध एलसी गेट्सच्या बदल्यात आरओबी च्या डीएफसीसीआयएल बांधकामाशी संबंधित विविध एलसी गेट्स राखण्यासाठी **क्योसान बनावटीच्या** ई.आय सिस्टममध्ये बदल करण्याच्या कामाशी संबंधित पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन करणे. **कामाचे अंदाजित मूल्य :** रु. ३९,००,०००/-. **इरठे :** रु. ७८,०००/-. **अनु क्र. : २. ई-निविदा सूचना क्र. : एसजी_१४१_१_६६_डीएफसीसी_ईआय_हिताची. दि. ०७.१०.२०२४. काम आणि ठिकाण :** मुंबई विभागाच्या विरार - सुरत सेक्शन दरम्यान विविध एलसी गेट्सच्या बदल्यात आरओबी च्या डीएफसीसीआयएल बांधकामाशी संबंधित विविध एलसी गेट्स राखण्यासाठी **हिताची बनावटीच्या** ई.आय सिस्टममध्ये बदल करण्याच्या कामाशी संबंधित पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन करणे. **कामाचे अंदाजित मूल्य** :रु. ७८,००,०००/-. **इरठे :** रु. १,५६,०००/-. **दोन्ही निविदांकरीता सादर करण्याची तारीख आणि वेळ :** दि. २८.१०.२०२४ रोजी १५.०० वा. **दोन्ही निविदांकरीता उघडण्याची तारीख आणि वेळ :** दि. २८.१०.२०२४ रोजी १५.३० वा. तपशीलाकरीता कृपया भेट द्या **www.ireps.gov.in**
**0607**
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

**बोली मागविणारी सूचना**

**३ वर्षांच्या कालावधीसाठी गोल्फ कोर्स, गेस्ट हाऊस सेक्टर ३६ आणि सिडको नोडल कार्यालय सेक्टर ४ येथील व्हीआरएफ/ व्हीआरव्ही एअर कंडिशनिंग युनिट आणि स्प्लिट /विंडो एअर कंडिशनिंग युनिटचे प्रचालन आणि सर्वंकष देखभाल.**

महाराष्ट्राची सिडको लिमिटेड, ई-निविदाकरण प्रक्रीयेद्वारे "ऑन लाईन" नग दर शतमान बोली खाली नमूद कामासाठी सर्व प्रकारच्या एअर कंडिशनर्सच्या वार्षिक देखभाल आणि दुरुस्तीमध्ये अनुभव असलेल्यांकडून मागवित आहेत: **1. कामाचे नाव : ३ वर्षांच्या कालावधीसाठी गोल्फ कोर्स, गेस्ट हाऊस सेक्टर ३६ आणि सिडको नोडल कार्यालय सेक्टर ४ येथील व्हीआरएफ/ व्हीआरव्ही एअर कंडिशनिंग युनिट आणि स्प्लिट /विंडो एअर कंडिशनिंग युनिटचे प्रचालन आणि सर्वंकष देखभाल. 2. सी. ए. क्र. :** ०६सिडको/ ईई(इले-मेट्रो)/२०२४-२५ **3. बोलीमध्ये भरायची रक्कम:** रु. ३८,०२,८७९.९२ (जीएसटी वगळता) **4. इ.र.ठे.:** रु. ३८,१००/- **5. नोंदणीकरण वर्ग:** ए **6. पूर्तता कालावधी:** १०९५ (एक हजार पंच्याणव) दिवस (पावसाळ्यासह) **7. निविदा प्रक्रीया शुल्क:** रु. १,१८०.०० (१८% जीएसटीसह (ना-परतावा)) बोली कार्यक्रमासह बोली कागदपत्रे **https://mahatenders.gov.in** संकेतस्थळावर १०/१०/२०२४ रोजी १७.०१ वा. पासून उपलब्ध असतील.

**कार्यकारी अभियंता**
**(इले-मेट्रो)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२७९/२०२४-२५

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना क्र. : का. अ. (पूर्व)/मं. झो. सु. मंडळ / ई-निविदा / ५२ / २४-२५**

कार्यकारी अभियंता [ पूर्व ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक ) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ०४ कामाकरीता बी - १ (टक्केवारी ) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक ११.१०.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक १८.१०.२०२४ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त http://mahatenders.gov.in. संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं.झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

Follow us:@mhadaofficial
CPRO/A/ 949
म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/-
कार्यकारी अभियंता (पूर्व).
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. १३३ / २०२४-२५**

कार्यकारी अभियंता [पश्चिम ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी / एमईएस/मुंबई मनहानगरपालिका / सिडको/ रेल्वे/ बीपीटी/एमआयडीसी एम. जे. पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ७ कामांकरीता बी-१ (Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | १०/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | १७/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १८/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | १९/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.
CPRO/A/ 945
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

**नवी मुंबई महानगरपालिका**
**शिक्षण विभाग**
**फेर-निविदा सुचना क्र. नमुंमपा/ शिक्षण/13/2024-25**
**कामाचे नाव:-** शैक्षणिक वर्ष 2024-25 करिता नमुंमपा शाळेतील बालवाडीच्या विद्यार्थ्यांना दररोज मध्यान्ह भोजन पुरविणेबाबत.
**अंदाजपत्रकीय रक्कम (रु.).:- 4,58,84,880/-**
**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.10/10/2024 रोजी प्राप्त होतील. फेर-निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचेआहे. ई-निविदा (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संर्पक करावे.**
**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**
सही/-
**उप आयुक्त (शिक्षण)**
**नवी मुंबई महानगरपालिका**
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/604/2024

**उल्हासनगर महानगर पालिका, उल्हासनगर**
शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालय

उल्हासनगर महानगरपालिका शहरामधील खाली नमुद ०१ काम योग्य वर्गातील ठेकेदाराकडून निविदा प्रणाली पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून दिनांक १०/१०/२०२४ रोजी निविदा मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती www.umc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नांव | रक्कम | टक्केवारी | कालावधी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उमपा/साबांवि/नोटीस/ २०२४-२५/१/१ | उल्हासनगर-३ मधील हिराघाट बोट क्लब येथे नवरात्री व छटपूजा करीता तलावाची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | ७००००० | १% | १ महिने | VI TH |

सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती www.umc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

जा.क्र./उमपा/ पिआरओ/३९२/२०२४
दि : ०९/१०/२०२४

सही/-
कार्यकारी अभियंता (साबांवि)
उल्हासनगर महानगरपालिका

**मुंबई :** मुलुंड विभागात अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने नागरिक संतापले आहेत. तेथील माजी नगरसेवकांकडे तक्रारी येत होत्या. त्यामुळे काल या माजी नगरसेवकांच्या नेतृत्वाखाली बृहन्मुंबई महानगरपालिका, टी वॉर्ड कार्यालयावर अपुऱ्या पाणीबाबत धडक मोर्चा काढण्यात आला. माजी नगरसेवक प्रकाश गंगाधरे, माजी नगरसेवक व गटनेते प्रभाकर शिंदे, माजी नगरसेवक डॉ. नील सोमय्या, माजी नगरसेविका समिता कांबळे यांनी यांच्यासह सहाय्यक आयुक्त अजय पाटणे यांना निवेदन देण्यात आले.



# पोहरा नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी 957 कोटींचा प्रकल्प - उपमुख्यमंत्री फडणवीस

## नागपूर येथे 1 हजार 300 कोटींच्या विविध कामांचे लोकार्पण व भूमिपूजन

प्रतिनिधी

■ नागपूर

दक्षिण सिवरेज झोनमधून वाहत असलेल्या सांडपाण्यामुळे पोहरा नदी अत्यंत प्रदूषित झाली आहे. या नदी मध्ये होणारे प्रदूषण कायम स्वरूपी बंद करण्यासाठी तसेच नैसर्गिक जलस्त्रोताचे बळकटीकरण करण्याकरिता 957 कोटी रूपयांचा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे दक्षिण सिवरेज झोनमधील सांडपाण्याचा प्रश्न सुटणार असल्याचे प्रतिपादन, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदार संघात सुमारे 1 हजार 300 कोटींच्या विविध कामांचे लोकार्पण व भूमिपूजन उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सर्वश्री प्रविण दटके, डॉ.परिणय फुके, आशिष जसस्वाल, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, आदिवासी विभागाचे अप्पर आयुक्त रविंद्र ठाकरे, मनपाच्या अतिरीक्त आयुक्त आंचल गोयल, स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा आदी उपस्थित होते.



पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पामुळे दक्षिण सिवरेज झोनमध्ये वाहणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे, त्यामुळे नागनदीप्रमाणेच पोहरा नदी सुध्दा प्रदूषणमुक्त होईल. येथील सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर निघणाऱ्या पाण्याचा इतर प्रयोजनासाठी पुर्नवापर करणे शक्य होणार आहे. सिवरेज लाईनचा प्रश्न पूर्णपणे सुटणार असल्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन करण्यास मदत होणार असल्याचे श्री.फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

नागपूर शहरातील वाहतूक व्यवस्था तसेच वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी तसेच अधिक सक्षम करण्यासाठी 'इंटिलिजेंट इंटीग्रेटेड ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टीम' सुरु करण्यात येत असून या व्यवस्थेमुळे शहरातील सर्व १६४ स्वयंचलित वाहतूक नियंत्रकाचे नुतनिकरण करण्यात येणार आहे. त्यांना मुख्य सर्व्हरशी जोडल्यानंतर वाहतुक नियंत्रण प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल होणार आहेत. या बदलामुळे वाहतुकींच्या नियमांचे कठोरपणे पालन होवून वाहतुक सुरळीत होण्यास मदत होईल. या प्रणालीसाठी 197 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

# चिखली मेहकर रोडवर बंद पडलेल्या बसवर दुचाकी धडकली

## दुर्घटनेत तीन युवकांचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी

■ बुलढाणा

चिखली मेहकर रोडवर वरदडा फाट्याजवळ आदिवासी पारधी शाळेजवळ मोठा अपघात झाला आहे. येथील आदिवासी शाळेजवळ बंद पडलेल्या बसवर पाठीमागून येणारी दुचाकी जोरदार धडकली. यात तीन युवक जागीच ठार झाले असल्याचे उघडकीस आले आहे.

हा अपघात मंगळवार दिनांक 8 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 7 च्या सुमारास झाला. या अपघातात तीन युवकांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या दुर्घटनेत गोपाल पंढरी सुरडकर (वय 21) रा.बेराला, धनंजय परमेश्वर ठेंग (वय 25) रा.वाघापूर, सुनील सुभाष सोनुने (वय 35) रा.खडक पुरा चिखली, अशी मृतांची नावे आहेत.



या दुर्घटनेत दुचाकी ज्या बंद बसवर धडकली ती बस चिखली आगाराची होती. घटनेची माहिती मिळताच साखरखेर्डा पोलिस ठाण्याचे ठाणेदार गजानन करेवाड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनेची तपासणी करत मृत युवकांचा मृतदेह चिखली येथे पाठवण्यात आले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर-चिखली मार्गावर मंगळवारी रात्री झालेल्या भीषण अपघातामध्ये तीन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मेहकर - चिखली रस्त्यावरील वरदडा या गावाजवळ हा अपघात झाला. एक दुचाकी एसटी बसवर जोरात आदळून हा अपघात झाला. यावेळी दुचाकी प्रचंड वेगात असल्याने त्यावरुन प्रवास करणाऱ्या तिन्ही तरुणांचा जागीच मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, हे तिन्ही तरुण मेहकर परिसरातील देवीचे दर्शन घेऊन आपल्या घरी परतत होते.

# महाराष्ट्रातील 15 जातींचा 'ओबीसी'मध्ये समावेश होणार

पान १ वरुन...

भोयर आणि पवार अशी स्वतंत्र नोंद घेत आयोगाने या ओबीसी जातींचा केंद्रीय सुचीमध्ये समावेश करण्यास अनुमती दिली आहे. कापेवार, मुन्नर कापेवार, मुन्नर कापू, तेलंगा, तेलंगी, पेंटारेड्डी, बुकेकरी या बेलदार जातीच्या उपजातींचा राज्य सुचीतील क. १८९ मध्ये समावेश असलेल्या जातींचा राज्य सरकारच्या शिफारसीनुसार आयोगाने नव्याने सुधारणा करीत केंद्रीय सुचीमध्ये समावेश करण्यास मान्यता दिली आहे. यासह राज्य सुचीतील क २६२ अंतर्गत असलेल्या लोध, लोधा व लोधी आणि क २६३ मध्ये समावेश असलेल्या डांगरी या जातीचा सुध्दा राज्य सरकारच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांच्या केंद्रीय सुचीमध्ये समावेशास आयोगाने हिरवा झेंडा दाखवला आहे.

# कॉलेजच्या विद्यार्थीनीची छेड काढणाऱ्या कंडक्टरला महिलांनी दिला चोप

■ रत्नागिरी

रत्नागिरी जिल्ह्यील दापोली येथे कॉलेजच्या विद्यार्थींनी आदर्शवत काम केलं असून त्यांच्या या धाडसाचं कौतूक होत आहे. एका मुलीची छेड काढणाऱ्या कंडक्टरला तिच्या मैत्रिणींनी चांगलंच धुतलंय. दापोली-पंचनदी बसमध्ये चढलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थिनीची छेडछाड केल्यामुळे बसमधील इतर विद्यार्थिनींनी आक्रमक पवित्रा घेत बस कंडक्टरची धुलाई केली आहे. या विद्यार्थींपैकी एका मुलीने चक्क चप्पल हाती घेऊन कंडक्टरला चांगलंच सुनावल आणि धोपटलंही आहे. मुलींचा हा रौद्रअवतार पाहून बसच्या आजूबाजूला चांगलीच गर्दी जमली होती, बस थांबवून कंडक्टरला चोप दिल्यामुळे दाभोळमध्ये ग्रामस्थांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

## महाराष्ट्रातील 7600 कोटींच्या विकास प्रकल्पांची पंतप्रधानांच्या हस्ते पायाभरणी

# नवीन 10 वैद्यकीय महाविद्यालयांमुळे महाराष्ट्राचे 'आरोग्य' बळकट होणार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही

प्रतिनिधी

■ मुंबई

महाराष्ट्रात दहा नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या माध्यमातून राज्याची आरोग्यसेवा अधिक बळकट होणार आहे. यामुळे राज्यातील एकूण वैद्यकीय जागांची संख्या 6000 होणार आहे. विकासाचा प्रत्येक प्रकल्प हा सामान्य जनतेसाठी असून, नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अद्ययावतीकरणाने आणि शिर्डी विमानतळावरील नवीन एकात्मिक टर्मिनल इमारतीमुळे व्यापार वाढणार आहे. यामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार असल्याचेही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे महाराष्ट्रातील 7600 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी केली. या प्रकल्पांमध्ये नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अद्ययावतीकरणाची पायाभरणी आणि शिर्डी विमानतळावरील नवीन एकात्मिक टर्मिनल इमारतीचा समावेश आहे. प्रधानमंत्र्यांनी महाराष्ट्रातील 10 सरकारी वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित करण्याचा आरंभ केला आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स (IIS), मुंबई आणि




महाराष्ट्राच्या विद्या समीक्षा केंद्र (VSK) चे उद्घाटन केले. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, देशाच्या विकासासाठी सरकारने आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा 'महायज्ञ' सुरू केला आहे. लाखो लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी राज्यात 10 नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात येत आहेत. यामुळे अंबरनाथ (ठाणे), मुंबई, नाशिक, जालना, बुलढाणा, हिंगोली, वाशीम, अमरावती, भंडारा आणि गडचिरोली हे जिल्हे लाखो लोकांसाठी सेवेची केंद्रे बनतील. महाराष्ट्रात आणखी 900 वैद्यकीय जागांची भर पडून एकूण वैद्यकीय जागा 6000 होतील.

गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील जास्तीत-जास्त मुले डॉक्टर व्हावीत आणि त्यांची स्वप्ने पूर्ण व्हावीत हे सरकारचे प्राधान्य आहे. एकेकाळी अशा प्रकारच्या विशेष अभ्यासासाठी मातृभाषेतील पुस्तके उपलब्ध नसण्याचे मोठे आव्हान होते. यावर मात करण्यासाठी महाराष्ट्रातील तरुणांना मराठी भाषेतून वैद्यकीय शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे. मातृभाषेतून शिक्षण घेऊन डॉक्टर होण्याचे स्वप्न तरुण पूर्ण करतील, असेही प्रधानमंत्री यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले या दिग्गजांच्या आशीर्वादामुळेच महाराष्ट्रात प्रगतीची कामे सुरू असल्याचे प्रधानमंत्री यांनी सांगितले.

# प्रवाशांना लुटणारी रिक्षा चालकांची टोळी जेरबंद

■ पुणे

स्वारगेट एसटी स्थानक परिसरात प्रवाशांना जबरदस्तीने लुटून जबरी चोरी करणाऱ्या रिक्षाचालकांच्या टोळी विरोधात स्वारगेट पोलिसांकडे तक्रारी आल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलिसांनी तपास करत गुन्ह्याच्या अनुषंगाने सुमारे १०० ते १५० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत 3 आरोपींना जेरबंद केले आहे. या प्रकरणी रोहित सुभाष चव्हाण (वय-२३,रा. फुरसुंगी, हडपसर,पुणे), मयुर ऊर्फ संकेत प्रकाश चव्हाण (१९,रा.देवाची उरळी,पुणे), सुर्दशन शिवाजी कांबळे (२२,रा.वारजे माळवाडी,पुणे) या आरोपींना अटक करण्यात आली आहे. स्वारगेट पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज नांद्रे यांनी सांगितले की, २७ सप्टेंबर रोजी पोलिसांकडे याबाबत एक गुन्हा दाखल झाला होता. स्वारगेट येथील एक प्रवाशी कात्रज बिबवेवाडी पीएमपीएमएल बस स्थानकच्या समोरुन घरी जाण्यासाठी पॅसेंजर रिक्षात बसले होते.


म्हाडा MHADA

# कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ

(म्हाडाचा प्रादेशिक घटक)

सदनिका विक्री सोडत जाहिरात - २०२४

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य विक्री योजना जाहिरात - २०२४

**कोंकण मंडळातर्फे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम, १९८१ आणि म्हाड (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ यामधील तरतूदीनुसार, मंडळाच्या विविध गृहनिर्माण योजनांतर्गत सदनिकांच्या विक्रीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.**

**प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेचे वेळापत्रक**

ऑनलाईन अर्ज स्विकृती सुरूवात दिनांक व वेळ : **११/१०/२०२४** रोजी **दुपारी १२.00 वाजता**

ऑनलाईन पेमेंट स्विकृती **दिनांक १२/१०/२०२४ दुपारी १२.00 वाजल्यापासून**

अनामत रक्कम भरून पात्र ठरलेल्या अर्जदारांची नावे म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे : **प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेला (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी) सायंकाळी 0६.00 वा.**

**(प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजना सदनिका उपलब्ध असेपर्यंत कार्यरत राहील)**

| अ.क्र. | योजना | एकूण सदनिका |
|---|---|---|
| 0१ | प्रधान मंत्री आवास योजना | ९८८३ |
| 0२ | एकात्मिक गृहनिर्माण योजना | ५१२ |
| 0३ | सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना | ६६१ |
| 0४ | कोंकण मंडळ प्रकल्पामधील विखुरलेल्या सदनिका | १३१ |
| | **एकूण** | **१११८७** |

**सोडतीकरिता ऑनलाईन अर्जाची सुरुवात, अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व सोडतीचे वेळापत्रक**

१. ऑनलाईन अर्जाची सुरूवात **दि. ११/१०/२०२४ दुपारी १२.00 पासून ते दि. १०/१२/२०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत.**

२. ऑनलाईन पेमेंट स्विकृतीचा **दि. १२/१०/२०२४ दुपारी १२.00 वाजल्यापासून ते दिनांक ११/१२/२०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत.**

३. बँकेत RTGS/NEFT द्वारे पेमेंट करण्याचा **अंतिम दि. ११/१२/२०२४** (संबंधित बँकेच्या वेळेपर्यंत)

सोडत दिनांक व वेळ : **२७/१२/२०२४** रोजी **सकाळी १०.00 वाजता**

**स्थळः** म्हाडा मुख्यालय, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई - ४00 0५१

| अ.क्र. | योजना | एकूण सदनिका |
|---|---|---|
| 0१ | सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना | ५९४ |
| 0२ | कोंकण मंडळ अंतर्गत सदनिका | ६0७ |
| 0३ | कोंकण मंडळ अंतर्गत भूखंड | ११७ |
| 0४ | पत्रकारांकरिता आरक्षित सदनिका | १२१ |
| | **एकूण** | **१४३९** |

**(अर्ज शुल्क ₹ ५00/- + जीएसटी @ १८% ₹ ९0/- = एकूण ₹ ५९0/- अर्ज शुल्क विना परतावा)**

योजनांचा सविस्तर तपशील, विस्तृत पात्रता निकष, ऑनलाईन अर्ज नोंदणी व भरणा, अनामत रक्कम भरणा, सूचना, अटी व शर्ती इत्यादी करिता कृपया खालील संकेतस्थळांवर व मोबाईल ॲपवर भेट द्यावी.

अर्जदारांनी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेसाठी https://lottery.mhada.gov.in व कोंकण म्हाडा सोडतीकरिता https://www.mhada.gov.in व https://housing.mhada.gov.in संकेतस्थळांवर ऑनलाईन अर्ज नोंदणी व भरणा करावा

Mobile App - MHADA Housing Lottery System

**सविस्तर जाहिरात दि. १०/१०/२०२४ रोजी दुपारी ३.00 वाजल्यापासून उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध होईल.**

**रेवती गायकर**
मुख्य अधिकारी,
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

CPRO/A/952

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us:@mhadaofficial


# गरोदर पत्नीला मारहाण करून खून करणाऱ्या पतीला जन्मठेप

■ हिंगोली

सेनगाव तालुक्यातील सवना तांडा येथे ऊसतोडीची उचल फेडण्यासाठी माहेरावरून १० हजार रुपये घेऊन येण्याच्या कारणावरून गरोदर पत्नीला मारहाण करून खून करणाऱ्या पतीला जन्मठेप व १० हजार रुपये दंडाच्या शिक्षेचा निर्णय जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायाधिश एस. एन. माने-गाडेकर यांनी बुधवारी दिला आहे.

याबाबत सहाय्यक सरकारी वकील ॲड. एन. एस. मुटकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सेनगाव तालुक्यातील सवनातांडा येथे अर्चना दीपके यांना सासरची मंडळी ऊस तोडीची उचल फेडण्यासाठी माहेरावरून १० हजार रुपये आणण्याची मागणी करीत होती. त्यानंतर ता. २२ ऑक्टोबर २०१५ रोजी रात्री अर्चना ह्या सात महिन्याची गरोदर असतांनाही त्यांना मारहाण करण्यात आली. या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी सखुबाई धवसे यांनी ता. २३ ऑक्टोबर रोजी गोरेगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून मयत अर्चना यांचा पती कचरू धवसे याच्यासह इतर पाच जणांवर खूनाचा गुन्हा दाखल झाला होता.

# घाटकोपरमध्ये प्लास्टिक वेष्टन तयार करणाऱ्या कारखान्याला भीषण आग

■ मुंबई

घाटकोपरमधील नारायण नगर परिसरात असलेल्या एका प्लस्टिकच्या कारखान्याला बुधवारी सायंकाळी भीषण आग लागली. सुदैवाने या आगीत कुठल्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही. मात्र मोठ्या प्रमाणात कच्चा माल जळून खाक झाला असून आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट पसरले होते. नारायण नगर परिसरातील या कारखान्याला बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास भीषण आग लागली. या कारखान्यात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक वेष्टनाची निर्मिती करण्यात येते. त्यामुळे कारखान्यात प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणात साठा होता. परिणामी काही क्षणातच आगीचा भडका उडाला.

# आरएमसी प्लाँटची परवानगी रद्द करण्यासाठी शिवसेना उबाठा आक्रमक

## प्रदूषण नियंत्रण मंडळाला दिला आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी

■ मुंबई

प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रयागनगर व प्रकाशनगर या वस्तीमध्ये 2 आर एम सी प्लांट ला दिलेल्या परवानगीच्या विरोधात शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आक्रमक झाली आहे. या प्लांट मुळे येथील स्थानिक नागरिकांना आरोग्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे या आर एम सी प्लांट ला दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्याची मागणी शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे) विभागप्रमुख प्रमोद शिंदे यांच्या माध्यमातून प्रदूषण नियंत्रण मंडळाला निवेदन पत्राद्वारे करण्यात आली असून हा प्लांट रद्द न झाल्यास दिनांक १५ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कल्पतरू पॉईंट, सायन सर्कल येथे दुपारी १२ वाजता जन मोर्चा काढण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. तसे पत्र प्रमोद शिंदे यांनी संबंधित सर्व आस्थापना आणि स्थानिक पोलीस ठाण्याला दिले आहे.



# शिवसेनेचे विधानसभा प्रमुख अशोक माटेकर यांचा वाढदिवस उत्साहात

**मुंबई :** चांदिवली विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेचे विधानसभा प्रमुख अशोक माटेकर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. शिवसेनेच्या माध्यमातून पवई तुंगाव्हिलेज परिसरात आपल्या सामाजिक कार्याची छाप पाडणारे विधानसभा प्रमुख अशोक माटेकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने तुंगा व्हिलेज परिसरात मोठा जलोष कार्यक्रम झाला. यावेळी अशोक माटेकर यांनी पत्नी माजी नगरसेविका अश्विनी माटेकर आणि नातलग मित्रपरिवारासह वाढदिवसाचा केक कापला. याप्रसंगी मोठ्या संख्येने विभागातील नागरिक वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. दरम्यान अशोक माटेकर आणि अश्विनी माटेकर यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत करून वाढदिवस उत्साहात साजरा केला.



# कमलाबाई कडवे कॅरम स्पर्धेत स्वरा, सृष्टी, संस्कृती, साराची विजयी सलामी



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व राष्ट्रीय मिल मजदूर संघ आयोजित क्रीडाप्रेमी स्व. कमलाबाई कडवे स्मृती आंतर शालेय-कॉलेज मुलींच्या विनाशुल्क कॅरम स्पर्धेत स्वरा कदम, सृष्टी चावंडे, संस्कृती निकाळजे, सारा देवन, अदिती चव्हाण आदींनी सलामीचे सामने जिंकले. स्वरा कदमने प्रारंभापासून अचूक खेळ करीत नाझीश खानचे आव्हान २५-० अशा नील गेमने संपुष्टात आणले. स्पर्धेचा उद्धाटन सोहळा राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते, बजरंग चव्हाण, अण्णा शिर्सेकर, दत्ता पाटील, काशिनाथ माटल, मारुती शिंत्रे, संयोजक लीलाधर चव्हाण आदींच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

परेल येथील आरएमएमएस सभागृहात मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे आदी जिल्ह्यातील ६० मुलींनी स्पर्धेत भाग घेतला. आर. बी. शिर्के हायस्कूल-रत्नागिरीच्या सृष्टी चावंडेने पहिला बोर्ड ७-० असा घेत प्रतिस्पर्धी तिरुमला काथूरोजीगिरीवर दबाव निर्माण केला. सृष्टीने आघाडीचे सातत्य राखत सलामीचा सामना १६-० असा जिंकला. अन्य सामन्यात नारायण गुरु हायस्कूल-चेंबूरच्या संस्कृती निकाळजेने सेस मायकल हायस्कूलच्या फातिमा शेखवर ९-० असा, पाटकर विद्यालय-डोंबिवलीच्या सारा देवनने पूर्वी सिंगवर १७-६ असा, रोझरी हायस्कूल-डॉकयार्डच्या अदिती चव्हाणने अनन्या अरविंदवर १३-५ असा विजय मिळवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. पंचाचे कामकाज चंद्रकांत करंगुटकर, अविनाश मोहिते, वेदांत महाडिक, विक्रांत धिवर आदी करीत आहेत.

## पीसीबीची बीसीसीआयपुढे शरणागती...

# चॅम्पियन्स ट्रॉफीत भारतीय संघ फायनलमध्ये पोचला तर अंतिम सामना लाहोरऐवजी दुबईत खेळवणार

**वृत्तसंस्था**
■ **लाहोर**

गेल्या काही काळापासून भारत आणि पाकिस्तानमधील संबंध चांगले नाहीत. त्यामुळे टीम इंडिया या देशाचा दौरा करत नाही. दोन्ही संघांमध्ये कोणतीही मालिका खेळली जात नाही, फक्त ICC स्पर्धा आणि आशिया चषक दरम्यान भारत आणि पाकिस्तानमध्ये सामने खेळले जातात. टेलिग्राफच्या एका रिपोर्टनुसार, ही स्पर्धा हायब्रीड मॉडेलवर खेळवली जाऊ शकते. या स्पर्धेचा अंतिम सामना लाहोर इथे होणार आहे. पण जर भारतीय संघ फायनलमध्ये पोहोचला तर फायनल मॅच पाकिस्तानबाहेर होईल, हा सामना दुबईत होण्याची शक्यता आहे.पण हे सर्व भारतीय संघ पाकिस्तानात खेळायला गेला तरच शक्य होणार आहे.

पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) चॅम्पियन्स ट्रॉफी 2025 च्या तयारीत व्यस्त आहे. ही आयसीसी स्पर्धा पुढील वर्षाच्या सुरुवातीला खेळवली जाणार आहे. मात्र, भारतीय क्रिकेट संघाच्या सहभागाबाबत अद्याप परिस्थिती स्पष्ट झालेली नाही. 2008 पासून भारतीय क्रिकेट संघानं पाकिस्तानचा दौरा केलेला नाही.



***29 वर्षांनंतर पाकिस्तानात आयसीसी स्पर्धा***

*तब्बल 8 वर्षांच्या प्रतीक्षेनंतर चॅम्पियन्स ट्रॉफीचं पुनरागमन होत आहे. त्याच वेळी, ही स्पर्धा गेल्या 29 वर्षांतील पाकिस्तानी भूमीवर ICC पहिली स्पर्धा आहे. ड्राफ्ट वेळापत्रकानुसार भारतीय संघाला आपले सर्व सामने लाहोरमध्ये खेळायचे आहेत. भारतीय संघ 20 फेब्रुवारीला बांगलादेशविरुद्ध पहिला सामना खेळणार आहे. यानंतर 23 फेब्रुवारीला न्यूझीलंडविरुद्ध दुसरा सामना खेळणार आहेत. त्याच वेळी, भारत 1 मार्च रोजी स्पर्धेचे यजमान आणि कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तान विरुद्ध गट टप्प्यातील तिसरा आणि शेवटचा सामना खेळेल. पण जर भारतीय संघ पाकिस्तान दौऱ्यावर गेलाच नाही तर या सर्व सामन्यांच्या ठिकाणी बदल दिसू शकतात.*

अशा परिस्थितीत 2025 च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय क्रिकेट संघ पाकिस्तानला जाण्याची शक्यता नगण्य आहे.

आशिया चषकातही टीम इंडियाने पाकिस्तानचा दौरा केला नव्हता .अशा परिस्थितीत, असे मानले जात आहे की भारतीय संघ चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेसाठी गेल्यास आपले सर्व ग्रुप स्टेजचे सामने पाकिस्तानबाहेर खेळेल आणि उपांत्य फेरीत पोहोचल्यानंतरही मैदानात बदल केले जातील. सध्या दोन्ही उपांत्य फेरीचे सामने पाकिस्तानमध्येच खेळले जाणार आहेत. आशिया कप 2023 चं यजमानपदही पाकिस्तानला मिळाले होते. .मात्र त्यानंतरही भारतीय संघानं पाकिस्तानचा दौरा केला नव्हता. ही स्पर्धा हायब्रिड मॉडेलमध्ये आयोजित करण्यात आली होती. भारतीय संघाने आपले सर्व सामने श्रीलंकेत खेळले आणि अंतिम सामनाही तिथेच झाला. म्हणजे तोच फॉर्म्युला पुन्हा एकदा आजमावता येऊ शकतो.

# शिवशक्ती, डॉ.शिरोडकर, श्री स्वामी समर्थ महिलांच्या उपांत्य फेरीत



छायाचित्र :- दिनेश घाडीगावकर

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

शिवशक्ती, डॉ. शिरोडकर, श्री स्वामी समर्थ यांनी शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित केलेल्या महिलांच्या कबड्डी स्पर्धेत उपांत्य फेरीत धडक दिली. कुमार गटात विजय क्लब, अमर क्रीडा मंडळ हे उपांत्य फेरीत दाखल झाले. दादर(पूर्व), शिंदेवाडी येथील भवानीमाता क्रीडांगणावर सुरू असलेल्या महिलांच्या सामन्यात स्टार खेळाडूंचा भरणा असलेल्या शिवशक्ती महिला संघाने गोलफादेवी प्रतिष्ठानचा ५३-०५ असा धुव्वा उडविला. पूर्वार्धात ३, तर उत्तरार्धात २लोण देत शिवशक्तीने गुणांचे अर्धशतक पार केले. गोलफादेवीला दोन आकडी गुणसंख्या देखील गाठता आली नाही. आंतर राष्ट्रीय खेळाडू सोनाली शिंगटे व पूजा यादव यांच्या झंझावाती चढाया त्यांना साधना विश्वकर्माची मिळालेली भक्कम बचावाची साथ यामुळे हे सहज शक्य झाले.

डॉ. शिरोडकर स्पोर्ट्स ने चंद्रोदय मंडळाला ४०-१० असे नमवित आपली घोडदौड चालूच ठेवली. पहिल्या डावात दोन लोण देत २५-०१ अशी आघाडी घेणाऱ्या शिरोडकरने नंतर मात्र सावध खेळ करीत आपला विजय साकारला. नेहा कदम, भाविका राऊळ यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. चंद्रोदयची श्रेय साठे चमकली. श्री स्वामी समर्थ मंडळाने अमर हिंद मंडळाला ४१-३७ असे पराभूत करीत उपांत्य फेरी गाठली. शेवटच्या क्षणापर्यंत सामना चुरशीने खेळाला गेला. साक्षी जंगम, मयुरी पाटील यांनी स्वामी समर्थ कडून, तर सलोनी नाक्ती, भूमी मर्चंड यांनी अमर हिंद कडून उत्कृष्ट खेळ केला. विजय क्लबने कुमार गटात एस.एस.जी. फाऊंडेशनचा ३७-३२ असा पराभव करीत उपांत्य फेरी गाठली. अत्यंत चुरशीने खेळाला गेलेल्या या सामन्यात विश्रांतीला १९-१७ अशी विजय क्लब कडे आघाडी होती. रोहन राज, आरिफ शेख विजय क्लब कडून, तर देवेंद्र कदम, सूरज जाधव फाउंडेशन कडून उत्तम खेळले. दुसऱ्या सामन्यात काळाचौकीच्या अमर मंडळाने श्रीराम विश्वस्त संघाला ३५-३४ असे चकवित उपांत्य फेरीत धडक दिली. पहिल्या डावात दोन्ही संघ १७-१७ असे बरोबरीत होते. दुसऱ्या डावात शेवटच्या क्षणी गुण घेत अमरने बाजी मारली. रमेश रायकर, प्रतीक यांना अमरच्या विजयाचे श्रेय जाते. आदित्य पार्ले, कार्तिक शेट्टी यांनी श्रीराम कडून कडवी लढत दिली.

विशेष व्यावसायिक गटात मुंबई पोष्टल, युनियन बँक, जे.जे.रुग्णालय, मध्य रेल्वे डिव्हीजन, रुबी कंट्रक्शन यांनी बाद फेरी गाठली. ग गटात मुंबई पोष्टलने रुपाली ज्वेलर्सला ४१-२७, युनियन बँकने सिद्धी कंट्रक्शनला ३९-१०, रुबी कंट्रक्शनने माझगाव डॉकला ३५-३१, जे.जे. रुग्णालयने मुंबई अग्निशमन दलचा ४४-२८ असा पराभव करीत बाद फेरी गाठली.

# ठाणे डीएसओ खो-खो स्पर्धेत श्री मावळी मंडळ शाळेस तिहेरी मुकुट



**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

ठाणे डीएसओ खो-खो स्पर्धेचे आयोजन दिनांक ५ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत श्री मावळी मंडळ संस्था, क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य व ठाणे महानगर पालिका ठाणे यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आल्या होत्या. ह्या स्पर्धेसाठी श्री मावळी मंडळ संस्थेतर्फे शतक वर्षानिमित्त निमित्त मैदान, मैदानावरील खर्च व बक्षिसांचा खर्च करण्यात आला. ह्या स्पर्धेमध्ये श्री मावळी मंडळ हायस्कूलच्या मुले १७ वर्षाखालील संघाने, मुली १७ वर्षाखालील संघाने व मुले १४ वर्षाखालील संघाने घवघवीत यश संपादन करीत श्री मावळी मंडळ हायस्कूलने विजयाचा तिहेरी मुकुट परिधान केला. ह्या तिन्ही संघांचे मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ह्या स्पर्धेत १७ वर्षाखालील मुले व मुली, १४ वर्षाखालील मुले व मुली असे ४ गट होते. प्रत्येक गटात ठाण्यातील जवळपास ६० शाळांनी भाग घेतला होता. १७ वर्षाखालील मुलांच्या गटातील अंतिम समन्यामध्ये श्री मावळी मंडळ हायस्कूलने सहकार विद्या मंदिर कळवा शाळेचा १ डाव ३ गुणांनी पराभव करून विजेतेपद मिळवले. ह्या सामन्यात श्री मावळी मंडळ हायस्कूलने एकूण ७ गडी टिपले तर सहकार विद्या मंदिर शाळेने ३ गडी टिपले. ह्या समन्यामध्ये श्री मावळी मंडळ हायस्कूलच्या कु. आयुष सोनवणे ह्याने 3 मिनिटे संरक्षण केले, कु. स्वरान जाधव ह्याने १ मिनिटे संरक्षण केले व कु. सोहम ठाकूर ह्याने नाबाद 1 मिनिटे संरक्षण करून शाळेस विजयी करण्यात योगदान दिले.

स्पर्धेच्या समारोप मा . सौ. रीमा देवरुखकर (क्रीडा अधिकारी ठा. म.पा. व छत्रपती शिवाजी पुरस्कार विजेती) हह्यांच्या हस्ते झाला. त्यांच्या सोबत संस्थचे अध्यक्ष सुधाकर मोरे, उपाध्यक्ष सुनील करंजकर, विश्वस्त रवींद्र आंग्रे, विश्वस्त केशव मुकणे, कार्यकारिणी सदस्य भगवान शिंदे, नरेंद्र पाठक (श्री मावळी मंडळ हायस्कूलचे CEO), रोशन वाघ (श्री मावळी मंडळ हायस्कूलच्या माध्यमिक विभागाचे मुख्य), सौ. आदिती हवालदार (श्री मावळी मंडळ हायस्कूलच्या प्राथमिक विभागाचे मुख्य) आणि सौ. नीता मिरकर (श्री मावळी मंडळ हायस्कूलच्या पूर्व प्राथमिक विभागाचे मुख्य) हे उपस्थिती होते.

# धार्मिक व कर्मठ आमदार दिलीप लांडे निवडणुकीत विजयी होतील - जगद्गुरू परमहंस महाराज




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारत हिंदुराष्ट्र करण्याच्या आपल्या वक्तव्यांमुळे नेहमीच चर्चेत राहणारे अयोध्या तपस्वी छावणीचे पिठाधीश्वर श्री श्री १००८ जगद्गुरू परमहंस महाराज यांनी मुंबईतील दौऱ्यात शिवसेना आमदार दिलीप लांडे यांच्या कार्यक्रमात सहभागी होऊन कडवट हिंदुत्ववादी विचार प्रकट करत आमदार दिलीप लांडे यांना विजयश्री चा आशीर्वाद दिला. चांदिवली विधानसभा क्षेत्रातील शिवसेना आमदार दिलीप लांडे यांनी प्रजापती हॉल मध्ये उत्तर भारतीय महिला सन्मान समारोह आणि जगद्गुरू महाराजांचे दर्शन व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी जगद्गुरु परमहंस महाराजांनी पुन्हा एकदा वादग्रस्त विधान करून मुस्लिमांची कुंभात गरज काय ? असा सवाल केला. जसे प्रेषित मोहम्मद हे मुस्लिमांसाठी मुख्य गोष्ट आहेत... त्याचप्रमाणे सनातन प्रेमींसाठी संत आणि ऋषी हेच सर्वस्व आहेत. मोहन भागवत यांच्या हिंद राष्ट्राच्या घोषणेवर ते म्हणाले की, भारत हिंदू राष्ट्र बनेल. एकनाथ शिंदे यांची विचारधारा हा सनातन संस्कृतीचा कणा आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची तत्त्वे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे नेत आहेत, तीच तत्त्वे जपण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. येथील भगवाधारी आमदार दिलीप लांडे हे राम भक्त असून धार्मिक व कर्मठ आहेत. लांडे पुढील निवडणुकीत नक्कीच विजयी होतील असा आशीर्वाद दिला. या दरम्यान आमदार दिलीप लांडे यांनी जगद्गुरू परमहंस महाराज यांचे भव्य स्वागत करताना म्हणाले की प्रभू श्री रामचंद्र च्या अयोध्या भूमितील संत आपल्या मुंबईत मला आशीर्वाद देण्यासाठी आले हे माझे भाग्यच समजतो संत येती घरा तोचि दिवाळी दसरा असे वातावरण संतांच्या सहवासात निर्माण झाले आहे. या धार्मिक कार्यक्रमात चांदिवली विभागातील नागरिक, उत्तर भारतीय संघाचे अध्यक्ष रामप्रसिद्ध दुबे, सेक्रेटरी भास्कर सिंह आदिसह संघाचे पदाधिकारी अन्य सदस्य तसेच विभागातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्पोर्टिंग क्लब कमिटीतर्फे मुलासाठी निवड चाचणी

**ठाणे :** मुंबई क्रिकेट संघटनेला संलग्न असलेल्या ठाण्यातील स्पोर्टिंग क्लब कमिटीतर्फे १२ आणि १४ वर्षे वयोगटाच्या मुलांसाठी निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. हि निवड चाचणी सेंट्रल मैदानातील इनडोअर अकादमी येथे १३ ऑक्टोबर रोजी होईल. या निवड चाचणीत सकाळी ९.३० वाजता १२ वर्षांखालील मूलांची (१जानेवारी २०१३ व त्यानंतर जन्म झालेली मूले) निवड चाचणी होईल.१४ वर्षांखालील मूले (१सप्टेंबर २०१० नंतर आणि १सप्टेंबर २०१३ पूर्वी जन्म झालेली) पात्र ठरतील. निवड झालेल्या खेळाडूंना मुबई क्रिकेट संघटनेच्या अधिकृत स्पर्धांमध्ये क्लबचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळू शकते. इच्छुक खेळाडूंनी आपापल्या जन्मदाखल्यांसह संपूर्ण पांढऱ्या गणवेशात किटसह वरील दिवशी आपापल्या वेळेप्रमाणे उपस्थित राहावे. इनडोअर अकादमी मध्ये निवड चाचणी होणार असल्यामुळे स्पाईक्स शूज वापरता येणार नाहीत..अधिक माहिती साठी क्लबचे प्रशिक्षक राज जाधव (९८२१०९५५७७) किंवा सचिन गोरिवले (९०२२२२१२३४) यांच्याशी संपर्क साधावा.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी मध्य रेल्वे चालवणार अतिरिक्त विशेष गाड्या

■ **मुंबई**

नागपूरच्या दीक्षाभूमी येथे दसऱ्याच्या दिवशी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरातील बुद्ध धर्मीय अनुयायी मोठ्या संख्येने जात असतात. त्यामुळे.मध्य रेल्वेने अतिरिक्त विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक ०१०१८ नागपूर - लोकमान्य टिळक टर्मिनस धम्मचक्र प्रवर्तन विशेष सुधारित वेळेसह चालणार आहे. 01029 विशेष गाडी ११.१०.२०२४ रोजी १८.०० वाजता सोलापूर येथून सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १२.४५ वाजता पोहोचेल. २) 01030 नागपूर - पुणे विशेष 01030 विशेष दि. १३.१०.२०२४ रोजी नागपूर येथून १६.१० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी १७.२० वाजता पोहोचेल. ३) 01132 नागपूर - अकोला अनारक्षित विशेष 01132 विशेष गाडी १३.१०.२०२४ रोजी नागपूर येथून ११.३५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १६.०० वाजता अकोला येथे पोहोचेल. ४) 01131 अकोला - अमरावती अनारक्षित विशेष 01131 विशेष गाडी दि. १३.१०.२०२४ रोजी १७.०० वाजता अकोला येथून सुटेल आणि अमरावती येथे त्याच दिवशी १८.३० वाजता पोहोचेल. ५) 07024/07023 नागपूर - बिदर - नागपूर विशेष 07024 विशेष गाडी १३.१०.२०२४ रोजी नागपूर येथून २०.१० वाजता सुटेल आणि बिदरला दुसऱ्या दिवशी ११.०० वाजता पोहोचेल. तसेच 07023 विशेष ११.१०.२०२४ रोजी बिदर येथून १८.४५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १२.०० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक 01029, 01030 आणि 07024 या विशेष गाड्यांसाठी विशेष शुल्कासह बुकिंग १०.१०.२०२४ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होणार आहे.

दरम्यान 01018 विशेष गाडी आता नागपूर येथून १३.१०.२०२४ रोजी १३.२५ वाजता (००.२० ऐवजी) सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी (त्याच दिवशी १९.०० ऐवजी) ०५.३० वाजता पोहोचेल. असे मध्या रेल्वेने कळविले आहे. विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा. असे आवाहन मध्या रेल्वेने केलेणाहे. प्रवाशांनी या विशेष रेल्वे सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# पुतळा विटंबनेच्या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या रमाबाई आंबेडकर नगरातील कार्यकर्त्यांवरील खटले मागे

■ **मुंबई**

घाटकोपर येथील रमाबाई नगरात १९९७ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्यानंतर तिथे आंबेडकर अनुयायांनी मोठे आंदोलन केले होते. पंतनगर पोलिसांनी जवळपास १५० आंदोलक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. मागच्या उध्दव ठाकरे सरकारने जी आर काढून हे गुन्हे रद्द केले आहेत. पण तरी या अनुयायांना कोर्टाची वारी अजूनही करावी लागत आहे.काल या केसची तारीख होती त्यावेळी आंदोलनकर्त्या अनुयायांचे वकील अँड. खालसा यांनी या संदर्भात न्यायालयात बाजू मांडली. आणि न्यायालयाने त्वरित मुंबई पोलिसांना केसेस रद्द करण्याचे आदेश देऊन पुढील तारीख ९ डिसेंबर ३०२४ च्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

घाटकोपर पूर्व येथील रमाबाई नगरात ११ जुलै १९९७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना कुणा आंबेडकर द्रोही प्रवृत्तीने मध्यरात्री केली होती.त्यानंतर तिथे झालेल्या आंदोलकांवर एस आर पी च्या पोलिस उपनिरीक्षक मनोहर कदम यांच्या पथकाने केलेल्या गोळीबारात १० निष्पाप भीमसैनिक शहीद झाले होते. पण पोलिसांनी तिथल्याच आंबेडकरवादी बुद्धिस्ट समाजातील १५० कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले . पण राज्यातील उध्दव बाळासाहेब ठाकरे सरकारने जी आर काढून आंदोलकांवरील केसेस मागे घेतल्या आहेत. पण पोलिसांनी या केसेस अद्याप मागे घेतलेल्या नाहीत त्यामुळे अजूनही त्यांना न्यायालयाच्या वाऱ्या कराव्या लागत होत्या.

# धरणे भरली.तरी 'एफ/उत्तर' विभागात 50 टक्के पाणी कपात

## रवी राजा यांची आयुक्तांकडे तक्रार

■ **मुंबई**

मुंबईला पाणी पुरवठा करणारी सातही धरणे जवळपास १०० टक्के भरली आहेत. तसे बऱ्याच वृर्तमानपत्रामध्ये जाहिर झाले आहे. असे असताना देखील मी प्रतिनिधीत्व करीत असलेल्या प्रभाग क्र. १७६ मध्ये कोकरी आगार, इंदिरानगर, नेहरु नगर, रावळी कॅम्प, जय महाराष्ट्र नगर, म्हाडा कॉलनी, भारतीय कमला नगर, शांती नगर अशा विविध विभागामध्ये ५० टक्क्यांच्यावर पाणी कपात चालू असून, काही विभागात दुषित पाणी देखील येत आहे. अशी तक्रार पालिकेतील माजी विरोधी पक्ष. नेते रवी राजा यांनी पालिका आयुक्त भूषण.गगराणी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

धरणे १०० टक्के भरलेली असूनही, पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे सदर विभागातील लोकांना खूपच गैरसोय व नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रावळी जलाशयामध्ये पाणी पूर्ण क्षमतेने येत नाही. सद्य स्थितीत नवरात्र उत्सव सुरु आहे आणि दिवाळी सण तोंडावर आला आहे पण लोकांना पाणी पुरेशा प्रमाणात मिळत नाही. सदर बाब गंभीर असून, याबाबत आपण स्वतः लक्ष घालून 'एफ/उत्तर' विभागातील लोकांना पुरेशा प्रमाणात स्वच्छ व शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत संबंधित आधिकाऱ्यांना आदेश देण्यात यावे अशी विनंती रवी राजा यांनी आयुक्तांना.केली आहे.


## मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ,
म्हाडाचा घटक

म्हाडा MHADA

**निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता ब-२ विभाग मुं, इ, दु व पु, मंडळ, महानगर पालीका ब -२ विभाग कार्यालय तिसरा मजला बाबूला टॅक कॉस लेन मुंबई ४०० ००९ विभागातर्फे इमारतीच्या दुरुस्तीच्या कामासाठी मुं.इ दु व पु मंडळ, म्हाडा, सा.बा.वि., कें. सा. बां.वि, रेल्वे, सिडको, एमएमआरडीए व मनपा मधील नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी १ नमुन्यातील शतमान तत्वावर मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | कामाचे नांव [इमारत क्र] | निविदासाठी ठेवलेली रक्कम रुपये | इसारा रक्कम रु. | सुरक्षा अनामत रक्कम रुपये + जीएसटी | परिशिष्ठ फी रुपये | निविदा देण्यांची तारीख | निविदा स्विकारण्यांची तारीख | निविदा उघडण्यांची तारीख | काल मर्यादा | नोंदणीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | ९ | १० |
| १ | इमारत क्र. २८-३० निशानपाडारोड (आमदार निधी | २,१०,१३५/- | २५००/- | ५०००/- | २३६/- | ११.१०.२०२४ ते १७.१०.२४ दुपारी १.०० वाजेपर्यत | १७.१०.२४ ते २१.१०.२४ दुपारी १.०० वाजेपर्यत | २१.१०.२४ दुपारी ४.०० वाजता शक्य झाल्यास | १२ महिने | नऊ व त्यावरील |
| २ | इमारत क्र. ५०-५८ एम ई सारंग. ( आमदार निधी | २,११,३०७/- | २५००/- | ५०००/- | २३६/- | | | | १२ महिने | नऊ व त्यावरील |
| ३ | इमारत क्र. १३३ बाबूला टॅक रोड ( आमदार निधी | ३,१९,३१०/- | ३५००/- | ७०००/- | ५९० / | | | | १२ महिने | नऊ व त्यावरील |
| ४ | इमारत क्र. ७३-७५ डॉ महेश्वरी रोड ( आमदार निधी | ३,४६,८२८/- | ३५००/- | ७०००/- | ५९० / | | | | १२ महिने | नऊ व त्यावरील |

१ जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युन्तम देकर सादर करणा-यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम निविदा उघल्याचा दिनांकापासून ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय नूनतम देकाराच्या निविदाकास लेखी विचारणा करुन त्यानी प्रथम न्यूनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मूंजर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सुचना पहावी.
२. कोऱ्या निविदा म्हाडा/ मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ के.सा.बां.वि./ रेल्वे/ बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
३. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी / निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नांव समाविष्ट नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
४ निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
५. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत/शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी मुं. इ. दु. व पु. मंडळ यांच्या नांवावर द्यावी.
६. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता ब-२ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई महानगर पालिका ब विभाग कार्यालय इमारत, तिसरा मजला, बाबूला टँक क्रॉस रोड, मुंबई- ९, यांचेकडून रकाना क्र. ७ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा दि. / / २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता कार्यकारी अभियंता ब-२ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
७. संयुक्तबोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
८. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.
९. निविदा स्विकृती दिनांकाच्या शेवटच्या दिवसापासुन ३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीपर्यत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राहय असले पाहिजे अन्यथा त्या कंत्राटदाराचा विचार केला जाणार नाही.
१०. भाडेकरू / रहिवाशी यांनी ना हरकत प्रमाणपत्राव्दारे संरचनात्मक दुरुस्तीसाठी किंवा पुर्नविकासाठी प्रस्ताव दाखल केल्यास, ठेकेदारास जरी देकारपत्र/आदेश देण्यात आले असतील तरी कुठल्याही नुकसानीबददल हक्क किंया दावा ग्राहय धरण्यात येणार नाही.
११. मागविण्यात आलेली निविदा एसएसआरवर आधारीत असून, त्यामध्ये जी. एस. टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदायगी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल. १२ जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

सही/-
( नितिन डोंगरे )
कार्यकारी अभियंता ब-२ विभाग,
मुं इ. दु. व पु मंडळ,

CPRO/A/936

Follow us: @mhadaofficial

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



मुंबईची माऊली, सायन प्रतिक्षानगर



तलासरी येथील उधवा गावातील प्रसिध्द जागृत मारुती मंदिर व श्री गणेश मित्र मंडळ उधवा तसेच ग्रामस्थ आणि व्यापारी वर्ग यांच्या सहकार्याने भाविकांचा मोठ्या उत्साहात नवरात्री उत्सव साजरा करण्यात येतो.




सरदार नगर सार्वजनिक दसरा महोत्सव मंडळ



सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाची भवानी मातेची मूर्ती (दातिवली, दळवी नगर, दिवा-आगासन रोड) वर्षे २२वे



सोनापूर लेन नवरात्रौत्सव, वरळी कोळीवाडा.




नूतन बाल मित्र मंडळ, श्रीराम गल्ली, वरळीगांव. सुवर्ण महोत्सवी वर्ष.



दामोदर सेवा मंडळ नवरात्र उत्सव मंडळ, वरळी गाव.



दिवा प्रभाग समिती महिला कर्मचारी वर्ग



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, (महापारेषण) सांघिक कार्यालय, वांद्रे, मुंबई



महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ वसाहत महिला मंडळ, चेंबूर



कॉसमॉस बँक, दादर शाखा



पीएचएस ग्रुप



सारस्वत बँक, प्रभादेवी शाखा



सी एस ए स्टाफ, घाटकोपर



आई एकविरा महिला मंडळ, हाशिवरे, ता. अलिबाग.



ओएनजीसी, ग्रीन बिल्डींग, बीकेसी



वस्तू व सेवाकर विभाग, माझगांव मुंबई



एन के जी एस बी बँक दिंडोशी शाखेतील महिला कर्मचारी.



नवी मुंबई महानगरपालिका जनसंपर्क विभागातील कर्मचारी



अपेक्स हॉस्पिटल मुलुंड येथील महिला डॉक्टर, नर्सेस व सहकारी महिला कर्मचारी.



पंजाब नेशनल बँक सिडीपीसी फोर्ट शाखा येथील महिला कर्मचारी



अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, बोरिवली न्यायालय, मुंबई, कर्मचारी.



तलासरी येथील उधवा गावातील प्रसिध्द जागृत मारुती मंदिर व श्री गणेश मित्र मंडळ उधवा तसेच ग्रामस्थ आणि व्यापारी वर्ग